कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

## दहावी, बारावीचे वेळापत्रक जाहीर

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. राज्य मंडळाचे सहसचिव प्रमोद गोफणे यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. तसेच प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. त्यात माहिती तंत्रज्ञान, सामान्य ज्ञान या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांचाही समावेश आहे. तर, २० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत दहावीची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे.

## लालू प्रसाद यादव यांना धक्का

**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांच्या प्रचाराला वेग आला आहे. या निवडणुकीत एकीकडे भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी, तर दुसरीकडे राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) आणि काँग्रेस अशा महाआघाडीसह आणखी काही स्थानिक पक्ष अशी लढत पाहायला मिळणार आहे. या घडामोडी सुरू असताना आणि बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी लालू प्रसाद यादव, तेजस्वी यादव आणि राबडी देवी यांना मोठा धक्का बसला आहे. आयआरसीटीसी घोटाळा प्रकरणात दिल्लीतील राउज ॲव्हेन्यू न्यायालयाच्या विशेष न्यायालयाने महत्वाचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात या तिघांच्याविरोधात आरोप निश्चित करण्याचे आदेश विशेष न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे लालू प्रसाद यादव आणि कुटुंबीयांसाठी हा निवडणूकीपुर्वी हा मोठा धक्का मानला जात आहे.

### जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचे

# आरक्षण जाहीर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्यपदांच्या आरक्षणाची सोडत सोमवारी (दि.१३) जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात काढण्यात आली. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणानंतर ५९ जागांमधील सदस्यपदांच्या आरक्षणाची प्रक्रीया जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली राबविण्यात आली. दुपारी बारा वाजल्यापासून आरक्षण काढण्यात सुरुवात झाली. मयुरा महाडीक आणि कायरा शिंदे या दोन मुलींच्या हस्ते सोडत काढण्यात आली.



(छायाचित्र : समीर मालोदे)

यावेळी उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके, अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार रसाळ आदींसह शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, ॲड. परेश देशमुख व इतर राजकिय पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. किशन जावळे यांनी जिल्हा परिषदेच्या ५९ जागांमधील सदस्यपदांचे आरक्षण जाहीर केले. त्यामध्ये अनुसूचित जाती १, अनुसचित जमाती ५, नागरिकांचा मागास प्रवर्ग ८ आणि सर्वसाधारण १६ अशा एकूण ३० जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यात पनवेल तालुक्यातील पाली देवद मतदार संघामध्ये अनुसूचित जाती महिला, पेण तालुक्यातील जिते, कर्जत तालुक्यातील मोठे वेणगांव, कशेळे व चौक, श्रीवर्धनमधील बोर्लीपंचतन मतदार संघामध्ये अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षण आठ जागांसाठी आहे. त्यामध्ये रोहा तालुक्यातील आंबेवाडी, घोसाळे, पनवेल तालुक्यातील वावंजे, वावेघर, महाडमधील बिरवाडी, पेणमधील खरवली, तळा तालुक्यातील रहाटाड व अलिबागमधील चेंढरे मतदार संघाचा समावेश आहे. सर्वसाधारण महिलांसाठी पनवेल तालुक्यातील आत्कारगांव, माणगाव तालुक्यातील माणगांव तर्फे वरेडी, पनवेल तालुक्यातील आत्करगांव, उरण तालुक्यातील चाणजे, माणगाव तालुक्यातील तळाशेत, पेण •➤पान २ वर

### जिल्हा परिषदेवर महिलाराज

५९ जागांपैकी ३० जागांवर महिला तर २९ जागांवर पुरुषांचे राज असणार आहे. या सोडतीमध्ये अनेकांच्या इच्छेला ब्रेक लागला. तर अनेकांची इच्छा पुर्ण झाल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे काहींची हिरमोड झाली, तर काहींनी आनंद व्यक्त केला. आरक्षणावर हरकती नोंदविण्यासाठी १७ ऑक्टोबरपर्यंत संधी देण्यात आली आहे. तहसील कार्यालयांसह जिल्हाधिकारी कार्यालयात हरकती नोंदवू शकता, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### अलिबाग

- ⏭ शहापूर – सर्वसाधारण
- ⏭ आंबेपूर – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ आवास – सर्वसाधारण
- ⏭ थळ – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ चेंढरे – नामाप्र (स्त्री)
- ⏭ कावीर – नामाप्र
- ⏭ चौल – सर्वसाधारण

### पनवेल

- ⏭ वावंजे – नामाप्र (स्त्री)
- ⏭ नेरे – अनुसूचित जमाती
- ⏭ पालीदेवद – अनुसूचित जाती (स्त्री)
- ⏭ पळस्पे– सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ वावेघर – नामाप्र (स्त्री)
- ⏭ वडघर – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ गव्हाण – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ केळवणे – नामाप्र

### कर्जत

- ⏭ कळंब – अनुसूचित जमाती
- ⏭ कशेळे – अनुसूचित जमाती (स्त्री)
- ⏭ माणगावतर्फे वरेडी – सर्वसाधारण(स्त्री)
- ⏭ नेरळ– सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ कडाव – नामाप्र
- ⏭ मोठे वेणगाव – अनुसूचित जमाती (स्त्री)

### खालापूर

- ⏭ चौक – अनुसूचित जमाती (स्त्री)
- ⏭ वासांबे – अनुसूचित जमाती (स्त्री)
- ⏭ सावरोली – सर्वसाधारण
- ⏭ आत्करगाव – सर्वसाधारण (स्त्री)

### सुधागड

- ⏭ जांभुळपाडा– सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ राबगाव – अनुसूचित जमाती

### पेण

- ⏭ जिते – अनुसूचित जमाती (स्त्री)
- ⏭ दादर – सर्वसाधारण
- ⏭ वडखळ – सर्वसाधारण
- ⏭ महालमिऱ्या डोंगर –अनुसूचित जमाती
- ⏭ शिहु – सर्वसाधारण (स्त्री)

## अलिबाग पंचायत समितीत समान संधी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या सभागृहात अलिबाग पंचायत समितीच्या सदस्यपदांची आरक्षण सोडत काढण्यात आली. उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रीया राबविण्यात आली. यावेळी अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील, गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे, शेकापचे अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत आदींसह विविध पक्षातील पदाधिकारी, उपस्थित होते.

तालुक्यातील वैजाळी, शहापूर, आंबेपूर, कावीर व आक्षी या पाच पंचायत समिती मतदार संघात सर्वसाधारण, रुईशेत भोमोली मतदार संघात अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्गाचे आरक्षण रेवदंडा मतदार संघासाठी जाहीर करण्यात आले. किहीम, चेंढरे, रामराज व चौल मतदार संघातील आरक्षण सर्वसाधारण महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) आरक्षण आवास व वरसोलीसाठी तसेच थळ मतदार संघातील आरक्षण अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी राखीव ठेवले आहे. पंचायत समितीच्या १४ जागांमध्ये महिला व पुरुषांना समान संधी देण्यात आली आहे. मयुरा महाडीक आणि कायरा शिंदे या दोन मुलींच्या हस्ते सोडत काढण्यात आली. तहसीलदार विक्रम पाटील यांनी आरक्षणाचे वाचन केले.

या आरक्षणावर हरकती घेण्यासाठी १७ ऑक्टोबरपर्यंत संधी देण्यात आली आहे. अलिबाग तहसील कार्यालयात हरकती नोंदवू शकता, असे आवाहन तहसीलदार विक्रम पाटील यांनी केले.

(सर्व पंचायत समितींचे आरक्षण पान ३ वर)




जिल्हा परिषद आरक्षण

### रोहा

- ⏭ नागोठणे – सर्वसाधारण
- ⏭ आंबेवाडी – नामाप्र(स्त्री)
- ⏭ भुवनेश्वर– सर्वसाधारण
- ⏭ घोसाळे – नामाप्र (स्त्री)

### तळा

- ⏭ चरई खुर्द – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ रहाटड – नामाप्र (स्त्री)

### माणगांव

- ⏭ निजामपूर– सर्वसाधारण
- ⏭ तळाशेत – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ मोरबा– सर्वसाधारण
- ⏭ गोरेगाव – अनुसूचित जाती

### म्हसळा

- ⏭ पाभरे– सर्वसाधारण
- ⏭ पांगळोली – सर्वसाधारण

### श्रीवर्धन

- ⏭ बोर्लीपंचतन–अनुसूचित जमाती(स्त्री)
- ⏭ आराठी – सर्वसाधारण (स्त्री)

### महाड

- ⏭ बिरवाडी– नामाप्र (स्त्री)
- ⏭ खरवली– नामाप्र (स्त्री)
- ⏭ नडगावतर्फे बिरवाडी– सर्वसाधारण
- ⏭ दासगाव– नामाप्र
- ⏭ करंजाडे– सर्वसाधारण

### पोलादपूर

- ⏭ कापडे बुद्रुक– नामाप्र
- ⏭ लोहारे– सर्वसाधारण

### उरण

- ⏭ नवघर – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ जासई – नामाप्र
- ⏭ चाणंजे – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ चिरनेर – नामाप्र

### मुरुड

- ⏭ कोर्लई – सर्वसाधारण (स्त्री)
- ⏭ राजपुरी – सर्वसाधारण

## जिल्हा परिषद माजी आमदारांचे ‘लाड’ पुरवेना

### शिक्षकांच्या बदल्यांसाठी सुरेश लाड यांचे आंदोलन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

कर्जतमधील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या बदल्यांचे लेखी आदेश काढूनदेखील त्याची कार्यवाही करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी टाळाटाळ केली. याप्रकरणी माजी आमदार सुरेश लाड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जाब विचारला. मात्र, कोणतेही ‘लाड’ न पुरविता त्यांच्या या प्रश्नाकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराबाबत नाराजी व्यक्त करीत लाड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनासमोर बैठक मांडून लढा पुकारला होता.



सुधाकर लाड यांच्या सांगण्यानुसार, कर्जतमधील जिल्हा परिषदशिक्षकांच्याबदल्यांच्यालेखी आदेशाची कार्यवाही करावी, या मागणीसाठी शिक्षणाधिकाऱ्यांसह मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी त्यांनी संपर्क साधला. त्यानंतर सोमवारी (दि.१३) दुपारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेण्यासाठी अलिबागमधील जिल्हा परिषदेतील कार्यालयात गेले होते. परंतु, मुख्य कार्यकारी अधिकारी शिक्षक पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाला गेल्या होत्या. त्याठिकाणीदेखील लाड गेले. कार्यक्रम प्रत्यक्षात सुरु होण्या अगोदर लाड यांनी •➤पान २ वर

> **ऑनलाईन पोर्टलवर बदल्या होतात. सातवा ऑफलाईन राऊंड झाल्यावर पुढील कार्यवाही केली जाईल. १५ पैकी १२ तालुक्यातील रिलीज झाले आहेत. आता मात्र कार्यवाही करणे शक्य नाही. – नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी**

### अपघातात जवानाचा

## दुर्दैवी मृत्यू

**। जैसलमेर । वृत्तसंस्था ।**

जैसलमेरच्या सीमावर्ती जिल्ह्यातील तनोट पोलीस स्टेशन परिसरात एक मोठा अपघात झाला. लष्कराची जीप अचानक उलटली असून त्यात मेजर टी.सी. भारद्वाज यांचा मृत्यू झाला आहे. तसेच, लेफ्टनंट कर्नल प्रशांत राय, मेजर प्राची शुक्ला, मेजर अमित आणि ड्रायव्हर नसिरुद्दीन हे जखमी झाले आहेत. ते लष्करी सरावावरून परतत होते. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. रामगड आणि लोंगेवाला दरम्यान असलेल्या गमनेवाला गावाजवळ हा अपघात झाला. अधिकारी सराव संपवून परतत असताना अचानक वाहनाचे नियंत्रण सुटले आणि ते उलटले. जखमींना लष्करी रुग्णवाहिकेतून रामगड रुग्णालयात हलविण्यात आले.

## प्रेयसीवर जीवघेणा हल्ला

### ■ अलिबागमधील कनकेश्वर मंदिराजवळील घटना

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कनकेश्वर मंदिर परिसरात एक धक्कादायक घटना घडली. प्रियकराने प्रेयसीच्या डोक्यावर, व कपाळावर लोखंडी हातोड्याचे घाव मारुन जीवघेणा हल्ला केला. ही घटना शुक्रवारी (दि.१०) सायंकाळच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात प्रियकराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयाच्या कारणावरून त्याने तिला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरज बुरांडे असे आरोपीचे नाव आहे. हा अलिबाग तालुक्यातील थेरोंडा–वरसोलपाडा येथील रहिवासी आहे. शुक्रवारी सायंकाळी सुरज आपल्या प्रेयसीसोबत कनकेश्वर मंदिराकडे जात होता. त्यावेळी पायऱ्यांजवळ असणाऱ्या वडाच्या झाडाजवळ ते उभे होते. त्यावेळी प्रेयसी दुसऱ्या मुलासोबत बोलत असल्याचा संशय सुरजमध्ये निर्माण झाला. त्याने आपल्या बॅगेतून लोखंडी हाताडो काढला आणि तिच्या डोक्यावर व कपाळावर घाव घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर तारेच्या जाळीत ओढत नेऊन तिला दगडाने मारहाण करून ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यात ती गंभीर जखमी झाली. अशा परिस्थितीही त्याने तिला तब्बल तीन तास त्याच ठिकाणी बसवून ठेवले होते.

## मुंबई-पुणे मार्गावर भीषण अपघात



### एकाचा मृत्यू

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

जुना मुंबई–पुणे मार्गावरील वावंढळ हद्दीत कंटेनर, टेम्पो आणि स्कुटी या वाहनांमध्ये भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात स्कुटी चालकाचा मृत्यू झाला असून टेम्पो चालक जखमी झाला आहे. दरम्यान, या अपघाताला दोन तास उलटून गेले तरी आयआरबी यंत्रणेने कोणतीच दखल घेतली नाही. त्यामुळे नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

जुना मुंबई–पुणे महामार्गावर सोमवारी (दि.१३) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास एमएच–४६–बीएम–९९३३ क्रमांकाचा ट्रेलर लोखंडी क्वाईल घेऊन पनवेलकडून खोपोलीच्या दिशेने जात होता. हा ट्रेलर वावंढळ हद्दीत येताच समोरून येणाऱ्या मोकाट जनावराला वाचवताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि एमएच–०४–एलई–७७४७ क्रमांकाच्या टेम्पोला मागच्या बाजूने जोरदार •➤पान २ वर

## उरणमध्ये अपघातांचे सत्र सुरूच



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणमध्ये अपघातांचे सत्र सुरूच असून खोपटा पूल ते नवघर मार्गावरील भेंडखळ वळणावर भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रेलरने दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला आहे. सुदैवाने दुचाकीस्वाराने सावधगिरी बाळगून उडी मारल्याने कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र, दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे.

उरण परिसरामध्ये बेदरकरपणे वाहने चालवल्याने आणि नियमाचे उल्लंघन केल्याने अनेक अपघात घडत आहेत. त्यातच सोमवारी (दि.१३) सकाळच्या •➤पान २ वर

## लहान माशांच्या विक्रीला बंदी



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

समुद्रात होणाऱ्या बेसुमार मासेमारीमुळे मत्स्यव्यवसाय धोक्यात आला आहे. बऱ्याच वेळा माशांची पूर्ण वाढ होऊ न देता मासे पकडण्यात येत आहेत. त्यामुळे मासळीचे प्रमाण घटून सागरी जीवसाखळी बिघडू लागली आहे. त्यासाठी मत्स्यविभागाने लहान आकारांचे मासे पकडणे आणि त्याची विक्री करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

लहान मासे म्हणजे अजून प्रजननक्षम न झालेले मासे असतात. त्यांना •➤पान २ वर

### स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण | पोलीस प्रशासनाची मवाळ भूमिका

## श्रीवर्धन तालुका गुन्हेगारीच्या विळख्यात

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुका पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांची जन्मभूमी असून हा तालुका शांतताप्रिय आहे. तसेच, श्रीवर्धनसह आसपासच्या समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची वर्षभर रेलचेल सुरू असते. परंतु, येथील काही राजकीय पक्षांनी पोसलेले गावगुंड तालुक्यात धुमाकूळ घालत असल्याचे दिसून येत आहे. तसेच, आत्ताच्या काही नवीन घटनांमुळे श्रीवर्धन तालुका संघटित गुन्हेगारीच्या विळख्यात जात असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे याचा गंभीर परिणाम पर्यटन व्यवसायावर होणार असल्याची भीती स्थानिक




व्यावसायिकांकडून वर्तविली जात आहे. असे असतानाही पोलीस प्रशासनकाडून मवाळ भूमिका घेतली जात असल्याने स्थानिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

सध्या श्रीवर्धन तालुका पर्यटनासाठी पसंतीचे ठिकाण आहे. त्यामुळे या ठिकाणी विविध विकास कामे देखील मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. परंतु, या ठिकाणी बाहेरून काम करण्यासाठी येणारे ठेकेदार व व्यावसायिकांना गावगुंडांकडून वेळोवेळी दमबाजी व शिवीगाळ करून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. त्यांच्याकडून हप्ता किंवा खंडणी मागण्यासारखे गंभीर प्रकार घडताना दिसत आहे. आता महिलांना देखील पुढे करण्यात येत असून त्यामध्ये ब्लॅकमेलिंग सारखे प्रकार घडत आहेत. त्यासाठी अनेक आस्थापनांमध्ये जाऊन दमबाजी, मारहाण करण्यापर्यंतच्या घटना देखील घडत आहेत. मात्र, या सगळ्या प्रकाराकडे पोलीस प्रशासनाकडून अत्यंत मवाळ भूमिका घेतली जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. एखाद्या व्यक्तीला गंभीर स्वरूपाची मारहाण होईपर्यंत गावगुंडांकडून मारहाण करण्यात येत आहे. पीडित व्यक्ती तक्रारीसाठी पोलीस ठाण्यात गेल्यानंतर त्याला पोलिसांकडून सहकार्य मिळत नाही. त्यामुळे अशा गावगुंडांना अभय मिळत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. असेच प्रकार भविष्यात सुरू राहिले तर राज्यभरातून येणारे पर्यटक भीतीने श्रीवर्धनकडे पाठ फिरवतील. त्याचा गंभीर परिणाम पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या स्थानिक व्यवसाय आणि व्यावसायिकांवर होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. काही राजकीय पक्षांचे तथाकथित नेते अशा प्रकारच्या गोष्टी करण्यासाठी कार्य तत्परतेने पुढे असतात, असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

## पासपोर्ट कार्यालयाची प्रतीक्षा कायम

### ■ खासदार श्रीरंग बारणे यांना विसर

**। उरण । प्रतिनिधी ।**

२०१८ साली पनवेलमध्ये स्वतंत्र पासपोर्ट कार्यालय होणार, अशी कबुली खासदार श्रीरंग बारणे यांनी पत्रकार परिषदेतून दिली होती. त्यासाठी आम्ही परराष्ट्र मंत्रालयाकडे पाठपुरावा करून ते मंजूर करून घेतले आहे. मात्र, यासंदर्भातील काही बाबी पूर्ण होण्यास किमान ६ महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे त्यांनी त्यावेळी सांगितले होते. मात्र, या आश्वासनाला ७ वर्षे उलटली असून नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन देखील झाले. त्यामुळे खासदार श्रीरंग खासदार बारणे यांना त्यांच्याच दिलेल्या आश्वासनाचा विसर पडल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.



पनवेल हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती असे ठिकाण आहे. त्यामुळे याठिकाणी पोहचणे सोयीचे आहे. सध्या जिल्ह्यातील रहिवाशांना पासपोर्ट काढण्यासाठी ठाणे शहर गाठावे लागते. •➤पान २ वर

# तरुणाला विजेच्या वाहिनीचा धक्का

## ● महावितरणच्या गलथान कारभाराचा चार महिन्यांतील चौथा बळी

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील अंजप गावातील एका तरुणाचा विजेचा धक्का लागल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अर्जुन मिणमीने (३८) असे या तरुणाचे नाव असून तो येथील एका झाडावरील पाने तोडत असताना त्या झाडीमधून गेलेली वीज वाहिनीचा त्याला धक्का बसला. दरम्यान, महावितरण कंपनीच्या चुकीच्या पद्धतीने वीज वाहिनी जोडण्याच्या कामामुळे मागील चार महिन्यांतील हा चौथा बळी असून महावितरण विभाग आपला कारभार सुधारत नसल्याने महावितरण प्रशासनाविरोधात जनतेचा रोष वाढला आहे.

कर्जत तालुक्यातील कळंबोली उप केंद्राजवळ असलेल्या अंजप गावातील तरुण अर्जुन मिणमीने हे सायंकाळी झाडाची पाने आणण्यासाठी गावाबाहेर पेज नदीकडे गेले होते. त्यावेळी कोरवले प्रकारच्या झाडाची पाने काढत असताना अचानक त्यांच्या हाताला विजेच्या वाहिनीचा धक्का बसला. त्या ठिकाणाहून मोठ्या दाबाचा वीज प्रवाह जात असल्याने ती वीज वाहिनी काही फूट अंतरावर झाडी म




धून गेली होती. त्यामुळे त्याची कोणतीही माहिती अर्जुन मिणमीने यांना नव्हती. त्यामुळे अनावधानाने विजेचा धक्का बसून अर्जुन मिणमीने तेथेच पडले. हा प्रकार गावातील स्थानिक ग्रामस्थांना माहिती होईपर्यंत अर्जुन यांचा त्याच ठिकाणी मृत्यू झाला होता.

या प्रकाराची माहिती अंजपसह परिसरातील ग्रामस्थांना समजल्यावर ते अंजप गावाच्या भागात जमले. अंजप गावातील ग्रामस्थांनी महावितरण कंपनीचे अधिकारी जोपर्यंत येत नाही तोपर्यंत अर्जुन मिणमीने यंचा मृतदेह उचलून देणार नाही, असा निर्धार केला होता. रात्री उशीरापर्यंत त्या ठिकाणी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. यादरम्यान कर्जत पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून बंदोबस्त केला होता. तर, महावितरण कंपनीचे उप अभियंता चंद्रकांत केंद्रे यांच्याकडून स्थानिकांचे तसेच पोलिसांचे फोन उचलले जात नसल्याने अंजप गावात आणखी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.

यापूर्वी महावितरण कंपनीच्या चुकीच्या धोरणामुळे कळंबोली उप केंद्राच्या पलीकडे असलेल्या गावातील आठ वर्षीय शिव मोहिते या बालकाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला होता. तो बालक रस्त्याच्या बाजूने खेळत असताना विजेच्या वाहिन्या टाकण्याचे काम अपूर्ण ठेवल्याने जमिनीवर राहिलेली वीज वाहिनीचा स्पर्श झाल्याने सालवड गावातील शिव मोहितेचा मृत्यू झाला होता. तर, बारणे गावातील एका आदिवासी कुटुंबातील दोन व्यक्तींचा शेवग्याच्या शेंगा काढण्यासाठी गेलेल्या व्यक्तींचा वीज वाहिनीचा धक्का लागून मृत्यू झाला होता.

## पाईपलाईनमुळे वयाळ गावच्या रस्त्याची दुरवस्था

**खोपोली** : वयाळ गाव ते लोधीवली रस्त्यावर गेली तीन वर्षापासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाईपलाईनचे काम सुरू आहे. यामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य आहे. चिखलातून वाहने चालविताना वाहनचालकांना आणि शाळकरी मुलांना नाहक त्रास होत आहे अपघाततही घडत आहेत. रस्त्याच्या कामासाठी ६ ते ७ कोटीच्या आसपास निधी उपलब्ध असतानाही पाईपलाईनचे काम केल्याशिवाय रस्त्याचे काम करून देण्यासाठी विरोधीत केला जात असल्याने नागरिक प्रचंड आक्रमक झाले असून आंदोलनाचा इशारा दिला आहे. खालापूर तालुक्यातील वयाळ ते लोधिवली रस्ता गेली ३० ते ३५ वर्षे वाहतुकीसाठी वापरला जात आहे.याच रस्त्यावरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नवीन पाईपलाईनचे काम गेली २ ते ३ वर्षापासून काम सुरू आहे. पाईपलाइन टाकण्यासाठी खोदकाम करताना रस्त्यावर खड्डे पडले आहेत.सदरील रस्त्याच्या कामासाठी शासनाकडून अंदाजे ६ ते ७ कोटी निधी मंजूर झाला आहे तरीही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आडमुठे धोरण अवलंबून रस्त्याचे काम करण्यासाठी मज्जाव करीत आहे. याविरोधात ग्रामस्थ लढा देत आहेत, परंतु त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने वयाळ गावातील ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यात आंदोलन करणार असल्याचे निवेदन दिले आहे.

पान १ वरून

## जिल्हा परिषद माजी आमदारांचे 'लाड' पुरवेना

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची व्यासपिठावर भेट घेऊन बदल्यांच्या प्रश्नांबाबत विचारणा केली. दरम्यान, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मध्येच हस्तक्षेप करीत बदल्यांसदर्भात आम्ही काय करणार, म्हसळा तालुक्यात ५० पदे रिक्त आहेत, असे म्हणल्या. त्यावेळी व्यासपिठावरच बदल्यांवरून शाब्दीक वाद सुरु झाला. त्यामुळे अपमानीत झालेल्या सुरेश लाड यांनी व्यासपिठावरून खाली उतरत मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांचे कार्यालय गाठले. हे सर्व नाट्य कार्यक्रमास उपस्थित शिक्षक, त्यांचे नातेवाईक आणि कार्यकर्ते पहात होते. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वीच हा सर्व प्रकार सुरु असताना सभागृहात कमालीची शांतता पसरली होती. याबद्दल बोलताना माजी आमदार सुरेश लाड यांनी सांगितले की, कर्जत व खालापूर तालुक्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांबाबत विचारणा करीत होतो. २५ सप्टेंबर रोजी शिक्षकांच्या मुलाखतीनंतर बदल्या करण्यात आल्या. मात्र, अद्यापही या शिक्षकांना सबंधित तालुक्यातून सोडण्यात आले नाही. कर्जत तालुका आदिवासी बहुल असल्याने दुर्गम भागात शिक्षकांची गरज भासत आहे. त्यामुळे लवकरात लवकर शिक्षकांनी हजर होण्याची मागणी तेथील पालक करीत आहेत. मतदार संघातील नागरिकांच्या हिताचा हा प्रश्न होता. आदिती तटकरे यांनी असे उत्तर देणे अपेक्षीत नव्हते, असे लाड म्हणाले. त्यानंतर लाड यांनी अलिबागमधील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या दालनासमोरील प्रतिक्षा कक्षाच्या आवारात बैठक मांडली. त्याठिकाणी ते बसून राहिले. जिल्हा परिषदेमध्ये थांबून सीईओंकडून शिक्षकांना शाळांवर हजर होण्याचे आदेश घेऊनच जाणार आहे, असे लाड म्हणाले.

## आरक्षण जाहीर

शिहू, सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा, तळा तालुक्यातील चरई खुर्द, उरणमधील नवघर, कर्जतमधील नेरळ, पळस्पे, मुरूड तालुक्यातील कोर्लई, अलिबाग तालुक्यातील आंबेपूर, थळ, पनवेलमधील वडघर आणि श्रीवर्धनमधील आराठी असे १६ जागांवर आरक्षण पडल्याचे जाहिर करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील ३० जागांवर महिलाराज असणार आहे. उर्वरित २९ जागांवर पुरुषांचा राज असणार आहे. त्यामध्ये सुधागडमधील राबगांव, पेणमधील महालमिऱ्या डोंगर, पनवेलमधील नेरे, कर्जतमधील कळंब आणि माणगांवमधील गोरेगाव या पाच मतदार संघात अनुसूचित जमाती आरक्षण जाहिर केले आहे. उरणमधील जसई, चिरनेर, पनवेलमधील केळवणे, कर्जतमधील कडाव, अलिबागमधील कावीर, महाडमधील दासगांव, पोलादपूरमधील कापडे बुर्दूक या सात मतदार संघातील आरक्षण नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच खालापूरमधील सावरोली, वासांबे, पेणमधील दादर, वडखळ, अलिबागमधील शहापूर, आवास, चौल, रोहामधील नागोठणे, भुवनेश्वर, माणगावमधील निजामपूर, मोर्बा, म्हसळामधील पाभरे, पांगळोली, महाडमधील नाडगांव तर्फे बिरवाडी, करंजाडी, पोलादपूरमधील लोहारे आणि मुरूडमधील राजपूरी असे १७ मतदार संघासाठी सर्वसाधारण आरक्षण काढण्यात आले आहे.

## उरणमध्ये अपघाताचे सत्र सुरूच

सुमारास खोपटा पूल ते नवघर मार्गावरील भेडखळ वळणावर एमएच-४३-सीके-१०९६ क्रमांकाच्या ट्रेलरने इंडिकेटर न देता वाहन वळवल्याने बाजूने चाललेल्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक बसताच दुचाकीस्वाराने आपल्या मोटरसायकल सोडून बाजूला उडी घेतली. त्यामुळे तो थोडक्यात बचावला. परंतु, दुचाकी त्या ट्रेलरच्या खाली जाऊन तिचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र मोटर सायकल स्वाराने बाजूला उडी घेतल्याने तो बचावला. ट्रेलरचालकाचे नाव जयप्रकाश बेचई यादव (३१) असे असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## मुंबई-पुणे मार्गावर भीषण अपघात

धडक दिली. या धडकेत ट्रेलरसह टेम्पोदेखील पलटी झाला. त्याच ठिकाणी खोपोलीतील राशिद राजपूत हे आपली दुचाकी उभी करून मोबाईलवर बोलत होते. त्यांना काही समजण्याआधीच टेम्पो आणि ट्रेलर त्यांच्यावर पटली झाले. अपघात एवढा भीषण होता की, त्या आवाजाने परिसरातील लोकांनी अपघाताच्या ठिकाणी धाव घेतली. आपघाताची माहिती सामाजिक कार्यकर्ते सुनील गायवाड यांनी पोलीस आणि आयआरबी यांना दिली. त्यांनतर प्राणीमित्र रामदास काईनकर, हेल्फ फाऊंडेशनचे धनंजय गीध, अर्जुन कदम, पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे, पोलीस घुले, गणेश पवार, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक गबहाले, सामाजिक कार्यकर्ते नितीन मालुसरे व दिनेश महाडिक यांनी जखमी अवस्थेत असलेले स्कुटी चालक राशिद राजपूत यांना दवाखान्यात दाखल केले. परंतु, त्यांचा अतिरक्तस्त्रावाने मृत्यू झाला. तर, टेम्पो चालक वाहनामध्येच अडकून पडला होता. त्याला जमावाने सुखरूप बाहेर काढले. दरम्यान, या दोन तासांच्या घटनेत आयआरबी यंत्रणेला अपघाताची माहिती देऊनही त्यांनी दखल घेतली नाही. त्यामुळे या यंत्रणेवर संताप व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आयआरबी यंत्रणेवर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात येत आहे.

## पासपोर्ट कार्यालयाची प्रतिक्षा कायम

दळणवळणाच्या दृष्टीने हे अंतर जास्त आहे. त्यामुळे पासपोर्ट कार्यालयामार्फत दिलेल्या वेळेत पोहोचणे अनेकांना शक्य होत नाही. त्यामुळे पासपोर्ट मिळण्यास विलंब होतो. पनवेलमध्ये पासपोर्ट कार्यालय झाल्यास नागरिकांच्या वेळेची बचत होईल, शिवाय पासपोर्ट वेळेत उपलब्ध होईल. २०१८ मध्ये पोस्ट ऑफिसमध्ये पासपोर्ट कार्यालय सुरू करण्याची योजना होती; परंतु, जागेअभावी हे शक्य झाले नाही. त्यानंतर हे केंद्र तात्पुरत्या स्वरूपात अलिबाग येथे हलवण्यात आले होते. डिसेंबर २०२४ मध्ये खासदार बारणे यांनी केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेऊन पनवेल येथे पुन्हा पासपोर्ट केंद्र सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र, अद्यापही कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिलेल्या शब्दाचा त्यांनाच विसर पडला असून नवी मुंबई विमानतळ उद्घाटन झाले तरी पासपोर्ट कार्यालयाला अद्यापही मुहूर्त मिळत नसल्याने स्थानिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## लहान माशांच्या विक्रीला बंदी

पकडल्यास ते मोठे होऊन अंडी घालू शकत नाहीत. त्यामुळे भविष्यातील मासळीचे प्रमाण घटते आणि समुद्री जैवसाखळी बिघडते. तसेच, लहान मासे हे मोठ्या माशांसाठी खाद्य असतात. त्यांची अतिविक्री किंवा पकड झाल्यास संपूर्ण सागरी खाद्यसाखळीवर परिणाम होतो. सध्या लहान मासे विकल्याने अल्पकाळ फायदा मिळतो, परंतु पुढील काही हंगामांत मोठ्या माशांचे प्रमाण कमी होते. त्यामुळे मत्स्यव्यवसायच घटतो. त्यासाठी माशांची वर्गवारी करून त्यांचा किमान आकार (एमएलएस) निश्चित करण्यात आला आहे. विक्रीसाठी लहान मासे आढळल्यास घाऊक आणि किरकोळ विक्रेत्यांना दंड केला जाणार असल्याचे मत्स्यविभागाने जाहीर केले आहे. घाऊक विक्रेत्यांना ५० हजार ते ५ लाखांचा तर किरकोळ विक्रेत्यांना माशांच्या किंमतीच्या ५ पट दंड केला जाणार आहे.

# गांजा तस्करीप्रकरणी सतरा जणांवर मोक्का

| पनवेल | प्रतिनिधी |

तरुणाईला व्यसनाच्या विळख्यात ओढणाऱ्या गुन्हेगारांविरोधात कल्याण पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. खडकपाडा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गांजा तस्करी प्रकरणात तब्बल १७ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील अशा प्रकारची ही पहिलीच कार्यवाही असल्याने अमली पदार्थ पेडलर वाल्यांनी धसका घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खडकपाडा पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कायद्यासह भारतीय हत्यार कायदा कलम प्रमाणे २ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास कल्याणचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कार्यवाही पथकाकडून सुरू होता. या तपासादरम्यान आतापर्यंत १३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून तब्बल ११५ किलो गांजा, वाहतुकीसाठी वापरलेल्या २ कार, २ दुचाकी, १ रिक्षा, १ पिस्तुल, २ जिवंत काडतुसे, २ वॉकी-टॉकी संच चार्जरसह असा सुमारे ७० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे २१ ऑगस्ट रोजी झालेल्या कारवाईत एकाच गुन्हेगारकडून ६२ किलो गांजा, पिस्तुल- वॉकी-टॉकी संच



जप्त करण्यात आले होते. या प्रकरणाच्या तपासात अजून ४ आरोपींची नावे समोर आली असून त्यांचा शोध सुरू आहे. प्राथमिक चौकशीतून उघड झाले की, ही टोळी मागील तीन वर्षांपासून अंमली पदार्थांची खरेदी-विक्री, तस्करी व पुरवठा करून अवैध मार्गाने मोठा आर्थिक फायदा मिळवत होती. आरोपी एकमेकांच्या संपर्कात राहून कधी एकत्र तर कधी स्वतंत्रपणे विविध साथीदारांच्या मदतीने हा बेकायदेशीर व्यवसाय करत असल्याची माहिती पोलीस आयुक्त अतुल झेंडे यांनी दिली आहे.

तसेच, या टोळीचा गुफरान हन्नान शेख हा प्रमुख असून त्याच्यासह इतर १६ साथीदारांविरुद्ध मोक्कांतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.



### जाहीर नोटिस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अषिलांनी खालील वर्णनाची मिळकत ही सदर मिळकतीचे विद्यमान मालक 1) श्री. अजित सखाराम चव्हाण, 2) श्रेयषी अजित चव्हाण रा. यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेणेचे ठरविले आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं | आकार (रू. पैसे) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| कामथ | 38 | 0-12-10 पो. ख. 0-01-30 एकूण 0.13.40 हे आर चौमी | 3.00 |
| कामथ | 39 | 0-15-90 पो. ख. 0-01-50 एकूण 0.17.40 हे आर चौमी | 4.00 |
| कामथ | 40 | 0-12-40 पो. ख. 0-01-00 एकूण 0.13.40 हे आर चौमी | 3.06 |
| कामथ | 496 | 0-09-60 पो. ख. 0-01-50 एकूण 0.11.10 हे आर चौमी | 2.44 |
| कामथ | 498 | 0-11-20 पो. ख. 0-01-20 एकूण 0.12.40 हे आर चौमी | 2.75 |

वरिल वर्णनाचे मिळकतीचे बाबत कोणा व्यक्तीचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दान, गहाण, बोजा, लीज, फरोक्तखत असल्यास तसेच त्यांची आमचे अशिलांच्या मूळ मालकांबरोबरच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत इसमांनी अगर संस्थांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसांचे आत लेखी स्वरूपात व पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी.

वरिल मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत खालील सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात न कळविल्यास वरिल वर्णनाचे मिळकतीषी कोणीही व्यक्ती अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही, तसेच आमचे अशिलांचे खरेदी व्यवहारास कोणत्याही प्रकारची हरकत नाही व असल्यास ती त्यांनी सोडून दिली आहे, असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व व्यवहारानंतर कोणी कुठल्या प्रकारची हरकत घेतल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही.

कळावे,

दि. 14/10/2025

**Mr. Chirag Sancheti**
305/ 307, Venkatesh Chambers, Ghanshyam Talwatkar Marg, Fort, Mumbai – 400 001.

### मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड

**सुचना सन २०२५-२६**

**दरपत्रक**

**म्यु.जा.क्र.११८१ /मु.न.प. २०२५-२०२६**

सर्व दरपत्रकधारकांस कळविण्यात येते की, मुरुड जंजिरा नगरपरिषद येथे उद्यान विकसित करणे, खालीलप्रमाणे उद्यान विकसित करावयाचे आहेत. तरी खालीलप्रमाणे उद्यान विकसित करणेकरिता इच्छुक दरपत्रकधारकांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदरचे दरपत्रक दिनांक १७/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयांत स्विकारणेत येतील. मागवून आलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही. दरपत्रकामधील दर सुवाच्छ अक्षरांत तसेच कोणतेही खाडाखोड असता कामा नये. कोणतेही दरपत्रक अगर सर्वच दरपत्रकांबाबत कारण न देता नाकारणेचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

| Sr. No. | Description Of Item | Qunantity |
|---|---|---|
| 1. | Providing and erecting FRP Murals consisting high and low relief design, embossed from back side filled FRP panel and mounting / fixing with screws made out of 6mm thick in FRP caste with colour grooved designed to hide the structural supports if required from inside including fabricating, welding, painting structural members which are exposed colouring the mural in duco paint, special PU painting, antique look, including transport, loding, unloading on site and installation in the Murud - janjira Minicipal limits etc. complete as per the sketch and drg approved by architect and as directed by engineering charge. (Excluding GST) | 1 |
| 2. | Providing and casting in Ferrocrete outdoor Garden Railing of 3'-0" height in the art form of wooden or bamboo pattern, including required foundation, painting with weather shield paint etc complete as per the sketch and drg approved by architect and as direeted by engineering charge. | 1 |
| 3. | Supply & installation of statue of 'अश्वारुढ श्री छत्रपती शिवाजी महाराज' as shown in the enclosed drawing / picture. Casted in bronze metal in 5mm to 6 mm thickness . approx. weight of statue is 2000 to 2300 kg. Installation with M.S./ S.S. frame/armiture embeded into specially designed RCC foundation, as shown in the enclosed drawing. Total height of the statue is 12'-6", Colour specification, oxydization & finishing process must follow as per the ISI standard. Including all permissions, transport and Structural stability and Repair/ maintenance of statue for 1 year. | 1 |

दि. १३-१०-२०२५

शिक्का

**सही/-**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

### जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने सुचित करण्यात येते की, मौजे सुरई, तलाठी सजा वरंडे तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील भुमापन क्र. व उपविभाग २०८ एकूण क्षेत्र ०-०२-०० हे. आर. (वरकस) आकार रु. ०.०५ पैसे ही मिळकत श्री. शांताराम भास्कर पाटील. राहणार- बागमळा यांचे खुद्द मालकीची असून सदर मिळकत विक्री करण्याकरिता आमच्या अशिलांबरोबर बोलणी करुन रक्कम रुपये ५ लाख स्विकारले असून साठेकरार केला आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिला आहे. याउपर सदर मिळकतीबाबत अथवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध करार साठेकरार फरोक्त, तारण, गहाण, लीन, लीज, बोजा अथवा वहिवाट वापर असल्यास प्रथमदर्शनी लेखी पुराव्याने खाली सही करणार यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हरकती सादर कराव्यात. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजुन सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार आमचे आशिल पूर्ण करतील व मागाहून हरकत उपस्थित झाल्यास कोणाचेही काही नुकसान झाल्यास आमचे आशिल जबाबदार राहणार नाहीत अशी समज देण्यात येत आहे.

अलिबाग
तारीख :- १३/१०/२०२५

**ॲड. प्रविण म्हात्रे.**
नागडोंगरी अलिबाग
मो.९८२२११४६४८/९८२२१२४६४८

### जाहीर नोटिस

आमचे आशील श्री. संजय आत्माराम साने, रा. चोरोंडे, पो. मापगाव, यांचे सांगण्यावरून तसेच दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे, मी ॲड. सचीन जोशी सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळवितो ते खालील प्रमाणे-

ज्या मिळकती करिता ही जाहीर नोटिस देण्यात येते त्याचे वर्णन खालील प्रमाणे-

**मौजे सोगाव, ता. अलिबाग, जि. रायगड गट क्र. २२२ नि.स.प्र., क्षेत्र १-५४-० व पो. ख. ०-१९-०, एकुण क्षेत्र १-७३-०, आकार १-९४ (रु. पैसे.)**

(यापुढे या जाहीर नोटीसीमध्ये उपरोक्त मिळकतीचा उल्लेख ''सदर मिळकत'' असा केलेला आहे.)

सदर मिळकती बाबत आमचे अशिलांनी मिळकतीचे आणि तत्कालीन आणि वर्तमान मालक श्री. कुशा भिवा चापडा आणि इतर यांच्या समवेत दि. ०३-०६-२०११ रोजी साठेकरार केलेला आहे. श्री. कुशा भिवा चापडा आणि इतर यांनी साठेकराराप्रमाणे खरेदीखत आमच्या आशील यांच्या लाभात न करून दिल्यामुळे आमचे आशील यांनी अलिबाग येथे दिवाणी दावा दाखल केलेला आहे. तसेच सदर मिळकतीच्या कामी मुंबई येथे उच्च न्यायालयात writ petition क्र. ६२/२०११ दाखल आहे. सदरहू writ petition मध्ये उभय पक्षकारांनी ताबेकब्जा बाबत आहे, ती परिस्थिती कायम ठेवावी असे आदेश पारित केलेले आहेत. अश्या परिस्थितीत आमचे आशील यांना खात्रीलायक माहिती मिळाली आहे की, श्री कुशा भिवा चापडा आणि इतर ही सदरहू मिळकत विकण्याच्या विचारात आहेत, त्यामुळे सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे काळविण्यात येते की सदर मिळकती बाबत कोणीही, कोणताही खरेदी-विक्रीचा व्यवहार करू नये आणि केल्यास तो आमच्या आशिल यांच्यावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १४-१०-२०२५

सही/-
**ॲड. सचिन जोशी**
मो. ९८२२६५३६५५
कार्यालयीन पत्ता-
फ्लॅट नंबर ३, साईलीला अपार्टमेंट, श्रीबाग नं. २. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**
**जुने सचिवालय, २ रा मजला, फोर्ट, मुंबई - ४०००३२**

रजिस्टर पोस्टाने
क्र.सदस्य(न्यायिक)टेनन्सी/रिव्ही/रायगड/L-८८६/२५
दिनांक १३/१०/२०२५

प्रति,
श्रीम. आशाबाई पांडुरंग जुनघरे ऊर्फ जुनघरा
रा. कसलखंड, पो. सोमटाणे,
ता. पनवेल, जि. रायगड.

**विरुध्द**

१३. रिजेनसी सुपेरिअर होम्स एल एल पी भागिदारी तर्फे
श्री. दिनेशकुमार मुरलीधर पासेरिया अखत्यारी
श्री. नरेंद्रकुमार कन्हैयालाल रावल
पत्ता- रिजन्सी हाऊस, विष्णू
दर्शन अपार्टमेंट समोर, अमन टॉकीज रोड,
उल्हासनगर-४२१००२.

**विषय :- सुनावणी नोटीसीबाबत**

वरील नांव धारण करणारा, अर्जदार यांनी उपविभागिय अधिकारी, पनवेल यांचेकडील क्र. टेनन्सी कात ४/अपिल क्र.४२६/२०२३ दि.०६/०६/२०२५ च्या आदेशाबाबत केलेल्या उपनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी दिनांक ०७/११/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता, सदस्य (न्यायिक) महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

सही/-
**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई**

**सुनावणीचे ठिकाण**
२/-महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र. हे. आर. पॉ |
|---|---|
| १३/१/ब | एकूण क्षेत्र १-८०-०० हे.आर,या पैकी उबैद मुहम्मद हुसैन शेख यांचे मालकीचे खाते क्र. ३६५ विक्री क्षेत्र ०-५६-८७ हे.आर, तसेच असफर शराकत चौधरी यांचे मालकीचे खाते क्र.३७५ विक्री क्षेत्र ०-२२-०० हे.आर, या मिळकतीबाबत |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/१०/२०२५

**ॲड.रोहित रो.मानकवळे**
मो.नं.९०२८८१७९३०
पत्ता-हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिरजवळ,
मु.पो कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.-पॉ | रुपये | पैसे |
| कमलाकर श्रीराम रसाळ व इतर ६ | ६४ | १० | ०-१०-०० | ० | ०९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.गौरकामथ,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
दिनांक :- १४/१०/२०२५

सही / -
**शंकेश राजेश ठाकरे**
अधिवक्ता
मो. नं. ९२८४८९२३८७

# इच्छुकांच्या पदरी निराशा, काहींना लॉटरी

## जिल्ह्यातील पंचायत समिती आरक्षण सोडत जाहीर

**जिल्ह्यातील पंचायत समितीमधील आरक्षण सोडत कार्यक्रम सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आला. या आरक्षण सोडतीत निवडणुकीसाठी तयारीला लागलेल्या काहींचा पदरी निराशा आली, तर काहींना आता अचानक लॉटरी लागणार आहे. जवळपास गेल्या तीन-साडेतीन वर्षांपासून जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका रखडल्या होत्या. आता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे अनेकांनी मैदानात मतदारांमध्ये संपर्क वाढवला होता. वेगवेगळ्या गणांमधून अनेक जण पंचायत समितीकरिता इच्छुक होते आणि तयारीलादेखील लागले होते. मात्र, आजच्या आरक्षण सोडतीमुळे काहींचा पदरी निराशा पडली, तर काहींना अचानक लॉटरी लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**

## रोह्यात नव्या समीकरणांची चाहूल

**| रोहा | सत्यप्रसाद आडाव/ अल्ताफ चोरडेकर |**

रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद नागठाणे, आंबेवाडी, भुवनेश्वर, घोसाळे यांसारख्या मतदारसंघांमध्ये यावेळी मोठे बदल झाले असून, काही जागा सर्वसाधारण तर काही महिला (नामनिर्देशित) अशा पद्धतीने राखीव ठेवल्या गेल्या आहेत. तर पंचायत समिती कोलाड नाम प्राप्त, नागोठणे नामप्राप्त महिला, सुकेळी अनुसूचित जाती जमाती महिला, आंबेवाडी सर्वसाधारण, धाटाव सर्वसाधारण महिला, भुवनेश्वर सर्वसाधारण, न्हावे सर्वसाधारण महिला, घोसाळे सर्वसाधारण महिला असे पंचायत समिती आरक्षण पडलेले आहे.



या निर्णयामुळे गेल्या काही वर्षांपासून ‘सुरक्षित बालेकिल्ला’ मानल्याजाणाऱ्यामतदारसंघांमध्येही नेत्यांची समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या या आरक्षणामुळे रोह्याच्या राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल लागली आहे. काहींसाठी हे आरक्षण ‘संधीचे दार’ उघडणारे ठरले, तर काहींसाठी ‘गेल्या मेहनतीवर पाणी फेरणारे’. आता पाहायचे एवढेच की या नव्या समीकरणात कोण उभा राहतो आणि कोण पडतो, पण एक मात्र नक्की, की रोहा तालुक्याच्या राजकारणाचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

## राबगाव अनु. जमाती महिलांसाठी राखीव



(छायाचित्र : गौसखान पठाण)

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील एकूण दोन निवडणूक विभाग व चार निर्वाचक गणांचा समावेश आहे. सोमवारी श्री बल्लाळेश्वर देवस्थानच्या भक्तनिवास एकमध्ये पंचायत समिती सदस्य आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी सुधागड प्रांत सायली ठाकूर, तहसीलदार उत्तम कुंभार, नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे, निवडणूक नायब तहसीलदार नकुल पोळेकर, निवासी नायब तहसीलदार भारत फुलपगारे, महसूल सहाय्यक श्रीकांत इचके, पुरवठा निरीक्षक अधिकारी सुखदेव वाडणकर तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अनुसूचित जमातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राबगावगणालाअनुसूचितजमातीचे आरक्षण निश्चित करण्यात आले. यानंतर सोडत पद्धतीने नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलासाठी परळी गणाला दिला गेला. उर्वरित जांभुळपाडा आणि अडूळसे हे सर्वसाधारण म्हणून पुकारण्यात आले. १९ जांभूळपाडा गटातील ३७ परळी व ३८ जांभूळपाडा असे दोन गण असून, यामध्ये एकूण १४ ग्रामपंचायतींचा समावेश आहेत. २० राबगाव गटातील ३९ राबगाव व ४० अडूळसे असे दोन गण असून, यामध्ये एकूण १९ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

## अनेकांचे धाबे दणाणले

**| पनवेल | दीपक घरत |**

तालुक्यात पंचायत समितीच्या गणांचे आरक्षण जाहीर झाले आहे. यात वडघर, कोन, पळस्पे, करंजाडे हे गण ओबीसी झाले आहेत. तर पोयंजे, वहाळ, गव्हाण, वावेघर, केळवणे, आपटा हे सर्वसाधारण राखीव झाले आहेत. त्यामुळे सर्व इच्छुकांनी आता लगेचच तयारीला सुरुवात केली आहे.

गेली काही वर्षे रखडलेल्या निवडणुका आता दारावर येऊन ठेपल्या आहेत. जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण यांचे आरक्षण जाहीर झाले असून, पनवेलमधीलदेखील जिल्हा परिषद गटाचे आणि पंचायत समिती गणाचे आरक्षण जाहीर झाले. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पंचायत समिती गणाची सोडत काढण्यात आली. यामध्ये पाली देवद अनुसूचित जाती स्त्रीसाठी राखीव झाला आहे. नेरे आणि चिंध्रण हे अनुक्रमे अनुसूचित जमाती स्त्री आणि अनुसूचित जमातीसाठी राखीव झाले आहेत.वडघर, कोन नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्रीसाठी तर पळस्पे, करंजाडे हे नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव झाले आहेत. वावंजे, आदई, वहाळ, वावेघर, आपटा हे सर्वसाधारण तर विचुंबे, पोयंजे, गव्हाण, केळवणे हे गण सर्वसाधारण स्त्री प्रवर्गासाठी राखीव झाले आहेत.

जिल्हा परिषद गटामध्ये पनवेल तालुक्यातील आठपैकी वावंजे आणि वावेघर नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्रीसाठी राखीव, तर केळवणे हा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव झाला आहे. नेरे गट अनुसूचित जमातीसाठी राखीव झाला आहे. पाली देवद हा गट अनुसूचित जाती महिलासाठी राखीव झाला आहे. पळस्पे, वडघर आणि गव्हाण हे सर्वसाधारण महिलांसाठी राखीव झाले आहेत. यामुळे आता अनेक इच्छुकांचे धाबे दणाणले आहेत. ऐन दिवाळीत निवडणुकीचा रंग चढणार आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवार आणि नेत्यांची तारांबळ उडणार आहे.

## मुरुड : चार गणांसाठी आरक्षण सोडत

**| आगरदांडा | गणेश चोडणेकर |**

मुरूड पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता सभापतीपदाचे आरक्षण सर्वसाधारण म्हणून जाहीर झाल्यानंतर बोर्ली, राजपुरी, कोर्लई, नांदगाव या चार गणांच्या जागेची आरक्षण सोडत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये मुरुड पंचायत समिती महाराष्ट्र भूषण डॉ.ति.श्री. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात तहसीलदार-उपविभागीय अधिकारी मुरूड दुर्गा देवरे व आदेश डफल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



तहसीलदार आदेश डफल यांनी प्रथम तालुक्यातील आलेल्या सर्व पक्षांचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांचे स्वागत करुन आरक्षणला सुरुवात करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेश व निर्देशानुसार ७६ राजपुरी गण अनु. जमाती महिला राखीव ठेवण्यात आली.

नांदगाव, बोर्ली, कोर्लई गणांसाठी चिठ्ठ्या बनवून प्लास्टिकच्या बरणीत सर्वांच्या देखत टाकण्यात आल्या. त्यामधील शिक्षण मंडळ नगरपरिषद ४ मधील विद्यार्थी हुजेफा शेख या ९ वर्षांच्या मुलीने एक चिठ्ठी उचलली. त्या चिठ्ठीमध्ये कोर्लई गणासाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला या नावाची चिठ्ठी काढण्यात आली. उरलेल्या दोन चिठ्ठ्या सर्वसाधारण, नांदगाव व बोर्ली सर्वसाधारण खुला आरक्षण आले.

आरक्षण सोडतेवेळी उपविभागीय अधिकारी मुरूड दुर्गा देवरे, मुरुड तहसीलदार आदेश डफल, निवासी नायब तहसीलदार संजय तवर, नायब तहसीलदार राजेश्री साळवी, निवडणूक नायब तहसीलदार कल्याण देऊळगावकर, गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ, महसूल सहायक प्रतिक पावसकर, सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते मनोज कमाने, ऋषिकांत डोंगरीकर, नौशाद शाबान, संदीप गोणबरे, शैलेश काते, विजय गिदी, मंदा ठाकूर, आदेश भोईर, शाम कोतवाल, बाबू नागावकर, चंद्रकांत कमाने, चरण पाटील आदींसह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## आरक्षणामुळे कही खुशी, कही गम

**| नेरळ | संतोष पेरणे |**

कर्जत पंचायत समितीच्या १२ जागांसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षणामुळे गेली दोन अडीच वर्षे पुढे ढकलली गेली होती. परंतु, आरक्षण सोडतीमुळे तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत.

कर्जत पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत कर्जत प्रशासकीय भवन येथे काढण्यात आली. प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीबद्दल सर्व माहिती कर्जत तालुक्याचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी दिली. कर्जत तालुक्यात पंचायत समितीच्या १२ जागा असून, त्यासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यासाठी कर्जत शहरातील कन्याशाळेच्या चौथीमध्ये शिकणाऱ्या अंशिका भारत प्रजापती आणि आसावरी प्रकाश भाटूप यांच्या हस्ते चिठ्ठ्या उचलण्यात आल्या.




तालुक्यातील एकूण १२ गणांपैकी माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, दामत, वाकस, कडाव आणि बीड बुद्रुक हे सहा जण सर्वसाधारण झाले आहेत. त्यातील दोन गण महिला राखीव ठेवण्यासाठी चिठ्ठ्या काढण्यात आल्या असून, सहापैकी कडाव आणि बीड बुद्रुक चार गण सर्वसाधारण महिला राखीव झाले आहेत. या आरक्षण सोडतसाठी राजेश भगत, केतन बेलोसे, अशोक कांबेरे, गणेश ठाकरे, समीर देशमुख, कुमार बोराडे, संजय तांबोळी, वसंत जाधव आदी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

कर्जत पंचायत समिती आरक्षण पुढील प्रमाणे आहेत. पोशीर- नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव, कळंब- अनुसूचित जमाती महिला राखीव, पाथरज- अनुसूचित जमाती महिला राखीव, कशेळे- अनुसूचित जमाती, माणगाव तर्फे वरेडी- सर्वसाधारण, उकरूळ- नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव, नेरळ- सर्वसाधारण, दामत- सर्वसाधारण, वाकस- सर्वसाधारण, कडाव- सर्वसाधारण महिला राखीव, मोठे वेणगाव- नागरिकांचा मागास प्रवर्ग, बीड बुद्रुक- सर्वसाधारण महिला.

## विकासाला बसणार खीळ

### पुढील अडीच वर्षे सभापतींची धुरा उपसभापतींकडे

**| म्हसळा | उदय कळस |**

म्हसळा पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता आरक्षण सोडत प्रक्रिया सोमवारी पंचायत समिती कार्यालयात पार पडली. अध्यासी अधिकारी भारत वाघमारे उपजिल्हाधिकारी पुनर्वसन यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राधिकृत अधिकारी तहसीलदार सचिन खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरक्षण सोडत काढण्यात आल्या. आरक्षण सोडतीनंतर निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या अनेकांना मोठा धक्का बसला आहे.




म्हसळा तालुक्यातील पंचायत समितीच्याचारगणातीलसदस्यांकरिता ही सोडत काढण्यात आली. यामध्ये पाभरे गटात सर्वसाधारण महिला, पांगलोली गटात ना. म.प्र. महिला, साळवींडे गटात सर्वसाधारण खुला, खरसई गटात सर्वसाधारण खुला असे आरक्षण पडले. या आरक्षण प्रक्रियेवेळी पक्षाच्या पदाधिकारी यांची उदासीनता दिसून आली. यावेळी मोजकेच पदाधिकारी उपस्थित होते. जि.प. पाभरे आणी पांगलोली या जागांसाठीसुद्धा आरक्षण जाहीर झाले असून, दोन्ही ठिकाणी सर्वसाधारण खुला आरक्षण पडले आहे. जिल्ह्याला सभापती आरक्षणात अनु. जमाती महिला आरक्षण पडले होते, परंतु निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार अनु. जमाती आरक्षण बसत नसल्यामुळे पुढील अडीच वर्षे उपसभापतींकडे सभापतींची धुरा सोपविली जाईल, त्यामुळे विकासाला खीळ बसण्याची शक्यता वर्तविली जाते. आरक्षण सोडतीची चिठ्ठी इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी अनन्या उदयकुमार कळस हिच्या हस्ते काढण्यात आली.



## दिग्गजांचे स्वप्न धुळीस

**| रसायनी | राकेश खराडे |**

खालापूर पंचायत समिती प्रभागाचे आरक्षण खालापूर पंचायत समितीच्या सभागृहात सोडत पद्धतीने खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी दोन शाळकरी मुलांच्या हातून चिठ्ठीद्वारे जाहीर केले.

खालापूर पंचायत समितीचे सभापती पदाचे आरक्षण खुले असल्याने अनेकांना सभापती पदाची स्वप्ने पडली होती, मात्र इच्छुक दावेदार, आर्थिक प्रस्थ आणि प्रस्थापित यांच्या स्वप्नांना तिलांजली मिळाली, त्यांच्या प्रभागात राखीव आरक्षण पडल्याने त्यांची सभापती पदाची स्वप्ने पूर्णपणे कोलमडून पडली आहेत. खालापूर पंचायत समितीमध्ये आठ गण आहेत. चौक गण आदिवासी महिलासाठी राखीव झाला असून, हाळ खुर्द आदिवासी राखीव पडला. वासांबे मोहोपाडा व वाशिवली हे नागरिकांचा मागास प्रवर्ग झाले असून, वाशिवली गणात स्त्री आरक्षण जाहीर झाले आहे. तर रीस, सावरोली, खानाव आणि आत्कारगाव हे सर्वसाधारण प्रभाग नक्की होऊन सावरोली आणि आत्करगाव सर्वसाधारण महिलासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. खालापूर तालुक्यातील अनेकांनी काही दिवसांपूर्वी सभापती पदाची तयारीदेखील केली होती. तरीही रीस आणि खानाव हे मातब्बर आणि यापूर्वी राजकीय पार्श्वभूमी असलेले नेते या ठिकाणी आहेत, त्यामुळे चुरस ही नक्की पाहावयास मिळणार आहे.

## तळा : आरक्षण सोडत जाहीर

**| तळा | श्रीकांत नांदगावकर |**

तळा पंचायत समिती गणाचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम श्री.डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात तहसीलदार स्वाती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यामध्ये ८५ बोरघर हवेली गण- सर्वसाधारण, ८६ चरई खुर्द गण- सर्वसाधारण महिला, ८७ रहाटाड गण- अनुसूचित जमाती आणि ८८ मांदाड गण- ना.मा. प्र महिला असे आरक्षण पडले आहे. यावेळी तहसीलदार स्वाती पाटील, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, नायब तहसीलदार मंगेश पालांडे, नायब तहसीलदार धर्मराज पाटील यांसह राष्ट्रवादी, शिवसेना शिंदेगट, भाजप यांसह विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण जाहीर झाल्यामुळे आता खऱ्या अर्थाने निवडणुकीला रंग चढणार आहे.

## इच्छुकांच्या आशेवर पाणी

- **तीन जागा अनुसूचित जमातीसाठी**
- **सहापैकी चार जागांवर महिला**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषदेच्या कर्जत तालुक्यात असलेल्या सहा जागांसाठी आज आरक्षण सोडत निघाली. या आरक्षण सोडतीत तीन जागा अनुसूचित जमातीसाठी तर दोन जागा सर्वसाधारण आणि एक जागा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहेत. दरम्यान, या आरक्षण सोडतीने कर्जत तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांना आणि इच्छुकांना जमिनीवर आणले आहे.

कर्जत तालुक्यात सहा जिल्हा परिषद गट आहेत. त्यातील तीन गट हे अनुसूचित जमातीसाठी राखीव झाल्या असून, त्यातील कशेळे आणि बीड बुद्रुक हे दोन जिल्हा परिषद महिला राखीव झाले आहेत. कडाव हा जिल्हा परिषद गट नागरिकांचा मागास प्रवर्ग राखीव झाला असून, अन्य दोन जागा सर्वसाधारण राखीव आहे. नेरळ आणि माणगाव तर्फे वरेडी हे दोन्ही गट सर्वसाधारण महिला राखीव झाले आहेत. यावेळी होणाऱ्या निवडणुकीत सहापैकी चार गट हे महिला राखीव बनले असून, सहापैकी तीन गट अनुसूचित जमाती राखीव झाल्याने राजकीय पक्षांची मोठी कोंडी झाली आहे. जिल्हा परिषद निवडणूक लढविण्याची तयारी करीत असलेल्या सर्व सहा प्रभागातील इच्छुक यांच्या आशा अपेक्षा यांच्यावर पाणी फेरले गेले आहे. आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. कळंब- अनुसूचित जमाती, कशेळे- अनुसूचित जमाती महिला, कडाव- नागरिकांचा मागास प्रवर्ग, नेरळ- सर्वसाधारण महिला, माणगाव तर्फे वरेडी- सर्वसाधारण महिला, मोठे वेणगाव- अनुसूचित जमाती महिला.




## आठ गणांसाठी आरक्षण

**| उरण | दत्तात्रेय म्हात्रे |**

उरण पंचायत समितीच्या एकूण आठगटातीलआरक्षणसोडतभूसंपादन उपजिल्हाधिकारी अविशकुमार सोनुने यांच्या अध्यक्षतेखाली आणि उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्या उपस्थितीत विशेष सभेत शालेय विद्यार्थी यज्ञेश चौधरी (९) रा. केगाव-उरण याच्या हस्ते चिठ्ठी काढून जाहीर करण्यात आली.

यामध्ये नवघर गण- ५१ मधील जागेवर (नामप्र सर्वसाधारण), भेंडखळ गण- ५२, केगाव गण-५५ व चाणजे गण- ५६ या तीन जागांसाठी सर्वसाधारण व जासई गण- ५३, चिरनेर गण- ५७ व आवरे गण- ५८ साठी या तीन जागा सर्वसाधारण (स्त्री राखीव) अशा आल्या असून, चिर्ले गण- ५४ मध्ये नामप्र (स्त्री राखीव) अशी उरण तालुक्यातील एकूण आठ पंचायत समिती गणातील आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. या आरक्षण सोडतीसाठी गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील, महसूल नायब तहसीलदार रवींद्र सानप, नायब तहसीलदार नरेश पेढवी व निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांच्यासह तालुक्यातील राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलादपूर पं.स. गणांची नावे बदलली

**| पोलादपूर | शैलेश पालकर |**

तालुका पंचायत समितीच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीसाठी चार सदस्यांच्या आरक्षणाची सोडत कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहात काढण्यात आली. यावेळी चारपैकी तीन पंचायत समिती गणांची नावे गणातील मोठ्या लोकसंख्येच्या गावानुसार बदलण्यात आली आहे.

पोलादपूर पंचायत समितीची २४ ऑक्टोबर २०१६ रोजी आरक्षणाची बैठक होऊन २०१७ मध्ये निवडणूक झाली. यानंतर तब्बल नऊ वर्षांनंतर आरक्षणाच्या बैठकीचे आयोजन तहसिल कार्यालयातील निवडणूक शाखेकडून करण्यात आले. यावेळी पूर्वीचे गण मोठया लोकसंख्येच्या गावांच्या नावानुसार बदलण्यात येऊन गोवेले ऐवजी माटवण, देवळे ऐवजी कापडे, कोंढवी ऐवजी कोतवाल बुद्रुक आणि लोहारे गणाचे नांव पूर्वीचेच कायम ठेवण्यात आले.



आरक्षणात चारपैकी एका गणातून नागरिकांचा मागास प्रवर्ग असण्याची अपरिहार्यता लोकसंख्येच्या निकषानुसार असल्याने चिठ्ठीद्वारे ११५ माटवण पं.स. नामाप्र महिला आरक्षित झाल्याचे जाहीर करण्यात आले. यानंतर उर्वरित तीन गणांपैकी चिठ्ठीद्वारे ११७ लोहारे गणाचे सर्वसाधारण आरक्षण महिला राखीव झाल्याचे जाहीर करण्यात आले. यामुळे ११८ कोतवाल बुद्रुक आणि ११६कापडे बुद्रक सर्वसाधारण तसेच लोहारे सर्वसाधारण महिला व माटवण नामाप्र महिला असे आरक्षण जाहिर झाले. याच दरम्यान अलिबाग येथे रायगड जिल्हा परिषदेच्या पोलादपूर तालुक्यातील दोन गटांचे आरक्षण जाहीर करण्यापूर्वी गट क्रमांक ६० देवळेचे कापडे बुद्रुक असे नामांतर झाले असून, या गटात नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण तर पूर्वीच्या लोहारे गट क्रमांक ६१चे कोतवाल बुद्रुक नामांतर करण्यात येऊन सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर येथील आरक्षण बैठकीची सूत्रे स्वत: तहसीलदार कपिल घोरपडे यांनी हाताळली आणि चिठ्ठीद्वारे आरक्षण काढण्याकामी जनसेवा प्राथमिक शाळेची इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी रिध्दी रवींद्र मोरे हिने सहकार्य केले.

## अनेकांचे पत्ते कट

### राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना भिडणार

**| माणगाव | सलीम शेख |**

माणगाव पंचायत समिती गणांचे आरक्षण माणगाव तहसीलदार कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे. भौगोलिकदृष्ट्या माणगाव तालुका मोठा असल्याने पंचायत समितीचे एकूण आठ गण असून, जिल्हा परिषदेचे चार मतदारसंघ आहेत. या सर्व मतदार संघाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. पंचायत समिती निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे पक्षाने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. हे पक्ष या निवडणुकीत एकमेकांना भिडणार आहेत असे चित्र दिसत आहे.

माणगाव तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी पुढीलप्रमाणे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. १. निजामपूर जि.प.- सर्वसाधारण, निजामपूर पं.स.- अनुसूचित जमाती, पाटणूस पं स.- ना. म. प्र. खुला, २. गोरेगाव जि.प.- अनुसूचित जाती, लोणेरे पं.स.- सर्वसाधारण, गोरेगाव पं.स.- सर्वसाधारण महिला, ३) मोर्बा जि.प.- सर्वसाधारण, मोर्बा पं.स.- सर्वसाधारण महिला, वडवली/मांजरवणे पं. स.- सर्वसाधारण, ४) तळाशेत जि.प.- सर्वसाधारण महिला, तळाशेत पं.स.- ना.म.प्र. महिला, साई पं.स.- सर्वसाधारण महिला असे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

# नोबेल नावाचे राजकारण

शांततेचे नोबेल पारितोषिक हा युरोपच्या राजकारणाचा एक भाग आहे. ते केवळ म्हणायलाच शांततेचे आहे. प्रत्यक्षात जगात युध्दे करणारे, अशांतता माजवणारे आणि त्यातून युरोप व अमेरिकेचा फायदा करून देणारे अशांनाच बहुतेकदा नोबेल दिले जाते. यंदाचे नोबेलही त्याला अपवाद नाही. व्हेनुझुएलामधील राजकारणी नेत्या मारिया मच्याडो यांना ते दिले गेले आहे. या मच्याडोबाई डोनाल्ड ट्रम्प यांच्या समर्थक आहेत. स्वतःच्याच देशातील सरकार उलथवून टाकण्यासाठी अमेरिकेने लष्करी मदत करावी अशी मागणी त्या बिनदिक्कतपणे करीत असतात. इस्रायलसारख्या रक्तपिपासू देशाचाही त्या गौरव करीत असतात. व्हेनेझुएलामध्ये निकोलस मदुरो यांची राजवट गेली दहा वर्षे सत्तेत आहे. मच्याडो त्यांच्याविरोधात लढत आहेत. मदुरो हे कम्युनिस्ट विचारांच्या नावाने कारभार करतात. पण ते हुकुशहा आहेत. विरोधकांना दडपणे, तुरुंगात टाकणे हे उद्योग ते सतत करीत असतात. अनेक नेते देशाबाहेर पळून गेले आहेत. मच्याडोबाई मात्र देशात राहूनच संघर्ष करीत आहेत. गेल्या वर्षीच्या निवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाला विक्रमी बहुमत मिळाले होते. पण मदुरो यांनी हे निकाल अमान्य केले व आपणच जिंकल्याचे जाहीर केले. तेव्हापासून मच्याडो या अज्ञातवासात राहून संघर्ष करीत आहेत. काल नोबेल पुरस्काराची बातमीही त्यांना त्याच अज्ञात ठिकाणी कळवण्यात आली. आता त्या हा पुरस्कार स्वीकारायला जाऊ शकतील की नाही याबाबत साशंकता आहे. असे नेते हे बाहेरच्या जगातील कोणालाही हिरो वाटतात. नोबेल पुरस्कार समिती याच भावनेचा फायदा उठवत असते. मच्याडो यांचे बाकीचे राजकारण, व्हेनेझुएलातील एकूण स्थिती याची बाहेरच्यांना खबर नसते. त्यामुळे हुकुमशहाविरुध्द लढणारी नेता म्हणून मच्याडो यांची ओळख करून दिली जाते व लोकांनाही ती आवडते. एका जुलुमी सत्तेविरुध्द लढा देण्याचे जे धैर्य मच्याडो दाखवत आहेत ते प्रशंसनीयच आहे. पण असेच असंख्य योध्दे जगात काम करीत असतात. पण ते आपल्या देशाच्या सरकारविरुध्द लढतानाच अमेरिका व युरोपच्या भांडवली दादागिरीच्या विरोधातही बोलत असतात. त्यामुळे त्यांचा नोबेलसाठी विचार केला जात नाही.

### अमेरिकेच्या लेखी हे सर्व गुलाम

मच्योडो याचे वडील पोलाद उद्योगातील मोठे कारखानदार होते. व्हेनेझुएलामध्ये तीन कोटी लोकांपैकी जवळपास सव्वादोन कोटी दारिद्र्यरेषेच्या खाली राहतात. उर्वरित ७५ लाखांपैकी मोजकेच लोक अतिश्रीमंत आहेत. या अतिश्रीमंतांमध्ये मच्याडो यांच्या कुटुंबाचा समावेश होतो. त्या इंडस्ट्रियल इंजिनिअर असून त्यांचे शिक्षण अशाच उच्चभ्रू कॉलेजांमधून झाले आहे. व्हेनेझुएलाचे यापूर्वीचे नेते ह्यूगो चावेझ कडव्या डाव्या विचारांचे होते. त्यांनी देशात अनेक उद्योगांचे राष्ट्रीयकरण केले. त्यात मच्याडो यांच्या वडिलांचा कारखानाही सरकारच्या मालकीचा झाला. त्यामुळे मच्याडो या देशासोबत स्वतःच्या कुटुंबासाठीही लढत आहेत हे लक्षात ठेवायला हवे. चावेझ यांनी व्हेनेझुएलातील क्रूड तेलाच्या खाणी तसेच गॅस कंपन्या यांचे राष्ट्रीयकरण केले. अरब देशांच्या बाहेर प्रचंड तेलसाठे व नैसर्गिक वायूसाठे असलेला व्हेनेझुएला हा प्रमुख देश आहे. दक्षिण अमेरिकेतील सर्व देश आपले मांडलिक आहेत अशी अमेरिकेतील सर्व अध्यक्षांची भावना असते. तिथल्या खाणी, जंगले, माणसे यांच्यावर आपला अधिकार आहे अशा रीतीने ते वागतात. त्यामुळेच निकाराग्वा, चिली अशा देशांमध्ये यापूर्वी अमेरिकेने सीआयएच्या मदतीने सरकारने उलथून टाकली होती. पेरुमध्ये सध्या तेच चालू आहे. ब्राझीलमध्ये डाव्यांचे सरकार असल्याने खवळलेल्या ट्रम्पने ५० टक्के आयातशुल्क लावले आहे. शिवाय त्या देशातील न्यायाधीश व नेते इत्यादींविरुध्द अमेरिकेत गुन्हे दाखल केले आहेत. व्हेनेझुएलाचे चावेझ यांनी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बुश यांच्यावर सतत टीका केली व क्यूबाच्या फिडेल कॅस्ट्रो यांच्याशी संधान साधून सर्व दक्षिण अमेरिकी देशांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. आधी तेलाचे राष्ट्रीयकरण व नंतर हा प्रयत्न यामुळे अमेरिकेने व्हेनेझुएलामधील असंतोषाला पैसे व मदत द्यायला सुरुवात केली. त्यातूनच मच्याडोबाईंसारखे नेते पुढे आले. मदुरो यांच्यासारख्या मूर्ख व हुकुमशाही नेत्यांमुळे अमेरिकेला हे करणे आणखी सोपे झाले. आता व्हेनेझुएलातील तेल व गॅस खरेदी करायचा असेल तरीही कोणाही कंपनी वा देशाला अमेरिकेची विशेष परवानगी घ्यावी लागते. गुलामीची प्रथा संपली असली तरी लॅटिन अमेरिकेतील छोटी राष्ट्रे आपली जणू गुलाम आहेत ही अमेरिकेची मानसिकता गेलेली नाही.

### अभिनंदन करताना सावधान

मच्याडो यांच्यासारख्या लोकांना हाताशी धरून अमेरिका याच रीतीने ठिकठिकाणी असंतोष माजवण्याचा प्रयत्न करीत असते. अशांचा संघर्ष कौतुकास्पद असला तरी त्यांची लोकशाहीची प्रेरणा अत्यंत संकुचित असते. त्यामुळेच ट्रम्पसारखा अमेरिकेत लोकशाहीला ठार मारणारा माणूस त्यांना जवळचा वाटतो. कारण, ट्रम्प यांचे सरकार त्यांना मदत करते. ट्रम्प यांना व्हेनेझुएलातील लोकांबद्दल प्रेम आहे वा लोकशाहीविषयी आस्था आहे म्हणून ते हे करीत नसतात. त्यांचा डोळा तिथल्या तेलावर असतो. पण मच्याडो व त्यांच्या समर्थकांना हे कळत नाही वा त्यांनाही ट्रम्पचे एजंट होण्यातच धन्यता वाटत असते. म्हणून ते अमेरिकी कंपन्यांसाठी सर्व काही खुले करण्याची मागणी करतात. त्याचे बक्षिस मग त्यांना नोबेलसारख्या पारितोषिकाच्या रुपाने मिळते. यंदा हे बक्षिस आपल्याला मिळावे असा हट्ट ट्रम्प यांनी धरला होता. आपण जगातील अनेक युध्दे बंद केली असा त्यांचा दावा आहे. पण तो खोटा आहे. गाझामध्ये ६० हजार माणसे मारण्यासाठी ट्रम्पनेच इस्रायलला शस्त्रे पुरवली. नंतर त्याच्याच मदतीसाठी इराणवर हल्ला केला. आता रशिया ऐकत नाही हे पाहिल्यावर युक्रेनला शस्त्रपुरवठा करण्याचे चालले आहे. त्यामुळे यांना शांतीचे नव्हे तर पैशांचे व अमेरिकेच्या एकाधिकाराचे अधिक प्रेम आहे. पुरस्कार मिळाल्यावर मच्याडो यांनी हा तो ट्रम्प यांनाच अर्पण केला यावरून एकाला झाकावा व दुसऱ्याला काढावा असाच हा सर्व प्रकार असल्याचे लक्षात येईल. अर्थात, पूर्वीच्या इतिहासात हे वारंवार घडले आहे. यापूर्वी किसिंजरसारख्या अत्यंत कपटी व नालायक अमेरिकी नेत्याला हा पुरस्कार दिला गेला होता. अमेरिकेच्या स्वार्थासाठी कोणत्याही देशासाठी कोणत्याही थराला जाणे म्हणजेच परराष्ट्र धोरण असे या नेत्याचे धोरण होते. यातूनच त्याने रशियाला शह देण्यासाठी १९७० च्या दशकात चीनशी मैत्री केली होती म्हणून त्याला पुरस्कार दिला गेला. पण बांगलादेशाच्या युध्दात हा इसम पाकिस्तानच्या बाजूने उभा राहिला होता. आणि व्हिएतनामवर जे संहारक हल्ले झाले ते याने कधीही रोखले नव्हते. अगदी बराक ओबामा यांना नोबेल देणे हाही भ्रष्टाचारच होता. कारण त्यापूर्वीच काही दिवस त्यांनी इराकवर खोटी कारणे सांगून हल्ला केला होता. तेव्हा मच्याडोबाईंना नोबेल मिळाले म्हणून अभिनंदन करताना आपण सावधगिरी बाळगायला हवी. दक्षिण अमेरिकेवर अमेरिकेचे राज्य प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात मदत करणारा असा हा निर्णय आहे.

विचार

# पर्यटन-पेट्रोकेमिकल्स क्षेत्रांची आघाडी

***धास्तावलेले अर्थविश्व जागेवर येवो, न येवो, देशांतर्गत छोट्या मोठ्या अर्थविषयक घडामोडी महत्वाच्या ठरत आहेत. अशीच एक लक्षवेधी बातमी म्हणजे फास्टॅग नसलेलेही आता यूपीआयद्वारे दंडाविना पैसे भरू शकतील. दरम्यान, मुकेश अंबानींनी पाणीविक्रीच्या व्यवसायात उतरुन पाणी जोखायचे ठरवले आहे. याच सुमारास पर्यटन आणि पेट्रोकेमिकल्स उद्योगात देश आघाडी घेणार असल्याचे चित्र समोर आले आहे.***




**महेश देशपांडे**

धास्तावलेले अर्थविश्व जागेवर येवो, न येवो, देशांतर्गत छोट्या मोठ्या अर्थविषयक घडामोडी महत्वाच्या ठरत आहेत. सजग सामान्यजन आणि गुंतवणूकदार त्यांची दखल घेत आहेत. अशीच एक लक्षवेधी बातमी म्हणजे फास्टॅग नसलेलेही आता यूपीआयद्वारे दंडाविना पैसे भरू शकतील. दरम्यान, मुकेश अंबानींनी आता पाणी विक्रीच्या व्यवसायात उतरुन पाणी जोखायचे ठरवले आहे. याच सुमारास पर्यटन क्षेत्रात तसेच पेट्रोकेमिकल्स उद्योगात देश आघाडी घेणार असल्याचे चित्र समोर आले आहे.

सरकारच्या नव्या नियमामुळे फास्टॅग न लावणाऱ्या वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे. टोल टॅक्स पेमेंट करण्यासाठी त्यांना आता यूपीआय पेमेंटचा वापर करता येईल. फास्टॅग नसेल तर आतापर्यंत टोल नाक्यावर दुप्पट टोल वसूल केला जायचा; पण आता हा भुर्दंड सहन करावा लागणार नाही. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सामान्य वाहनधारकांना अलिकडेच मोठा दिलासा दिला. विना फास्टॅग वाहनांना टोल भरण्यासाठी सुविधा देण्यात आली आहे. टोल टॅक्स पेमेंट सहज आणि सोपे करण्यात आले आहे. वाहनावर फास्टॅग लावला नसल्यास वाहनधारकांना दुप्पट टोल द्यावा लागत होता; पण नवीन नियमानुसार, फास्टॅग नसेल तरीही टोल देता येईल. त्यासाठी अतिरिक्त शुल्क घेण्यात येणार नाही. म्हणजेच 'युपीआय'च्या मदतीने टोल टॅक्स पेमेंट केले तर आता दुप्पट टोल भरावा लागणार नाही. फास्टॅग नसेल तर रोखीत दुप्पट टोल भरावा लागत होता. पण नवीन नियमानुसार, आता फास्टॅग नसेल तर आणि युपीआय पेमेंटद्वारे टोल भरायचा असेल तर आता १.२५ पट टोल द्यावा लागेल. ही नवीन व्यवस्था १५ नोव्हेंबरपासून देशभरात लागू होईल. टोल नाक्यावरील गोंधळ आणि घोटाळे थांबवण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने फास्टॅग सेवा अनिवार्य केली आहे. फास्टॅगची अंमलबजावणी झाल्यापासून टोलनाक्यावरील गर्दी, गोंधळ कमी झाला. वाहनांच्या लांबच लांब रांगा कमी झाल्या. २०२२ पर्यंत फास्टॅगची व्याप्ती ९८ टक्क्यांपर्यंत पोहोचली होती. नियमानुसार, विना फास्टॅगवाल्या वाहनांना टोल नाक्यावर दुप्पट टोल भरावा लागत होता. आता 'युपीआय' पेमेंटद्वारे टोल टॅक्स भरत असाल तर सव्वापट टोल भरावा लागणार आहे.

दरम्यान, मुकेश अंबानी यांच्या 'रिलायन्स इंडस्ट्रीज'च्या एफएमसीजी युनिट 'रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड'ने (आरसीपीएल) बाटलीबंद पाण्याच्या क्षेत्रामध्ये उडी घेतली आहे. कंपनीने 'शुअर' या नावाने मिनरल वाटर लाँच केले आहे. या नवीन ब्रँडची किंमत बिस्लेरी आणि किनलेपेक्षा कमी आहे. त्यामुळे पिण्याच्या पाणीविक्रीच्या बाजारात खळबळ उडाली आहे. या क्षेत्रात आता नवे युद्ध रंगण्याची शक्यता आहे. शुअर हा ब्रँड किफायतशीर असेल. इतर ब्रँडपेक्षा त्याची किंमत अत्यंत कमी असेल. त्यामुळे बाजारपेठेत मोठी खळबळ उडेल. रिलायन्सने यापूर्वी 'कॅम्पा कोला' सारख्या कोल्ड ड्रिंकनंतर आणखी एक मोठे पाऊल टाकले आहे. रिलायन्स दैनंदिन उत्पादनांच्या बाजारात उतरले आहे. ३० हजार कोटींच्या पॅकेज्ड पाणी बाजारात रिलायन्स आता मोठा खेळाडू होऊ पाहत आहे. 'शुअर'च्या २५० मिलीलीटर पाणी बॉटलची किंमत पाच रुपये इतकी असेल. 'कॅम्पा शुअर' येत्या दोन आठवड्यांमध्ये उत्तर भारतातील बाजारात दाखल होईल.

या ब्रँडच्या मोठ्या पॅकची किंमत इतर कंपन्यांच्या तुलनेत वीस ते तीस टक्के कमी आहे. एक लिटर 'कॅम्पा शुअर'ची बाटली १५ रुपयांना मिळेल. बिसलेरी, कोका-कोला, किनले, पेप्सिकोच्या 'अ‍ॅक्वाफिना'ची किंमत सध्या २० रुपये इतकी आहे. 'कॅम्पा शुअर'च्या दोन लिटर पॅकची किंमत २५ रुपये इतकी आहे. प्रतिस्पर्ध्यांच्या दोन लिटर पॅकची किंमत ३०-३५ रुपये इतकी आहे. 'रिलायन्स कंझ्युमर प्रोडक्टस' स्थानिक पाणी उत्पादकांशी करार करण्याची शक्यता आहे. त्यासाठी त्यांची तयारी सुरू आहे. त्याआधारे स्थानिक बाजारपेठेत हे उत्पादन त्वरीत उपलब्ध होईल. त्यासाठीचा दळणवळणाचा खर्च वाचेल आणि किंमती कमी ठेवण्यासाठी हा प्लॅन यशस्वी ठरेल. यामुळे स्थानिक बाजारपेठेत रोजगार वाढेल. तीस हजार कोटींच्या या मिनरल वॉटर सेगमेंटमध्ये भविष्यात मोठी स्पर्धा दिसून येईल. जीएसटी सुधारणांमध्ये पॅकेज्ड पाणी विभागामध्ये नैसर्गिक आणि कृत्रिम मिनरल वॉटरचा समावेश आहे. त्यावर अगोदर १८ टक्के जीएसटी लागू होता. आता हा जीएसटी पाच टक्क्यांवर आला आहे. आता एक लक्षवेधी बातमी. आंतरराष्ट्रीय प्रवास आणि पर्यटन क्षेत्रात पुढील दहा वर्षांमध्ये नऊ कोटी दहा लाख नवीन नोकऱ्या निर्माण होतील, अशी बातमी आहे. याचा अर्थ असा की जगभरात निर्माण होणाऱ्या प्रत्येक तीन नोकऱ्यांपैकी एक या क्षेत्रात असेल. ही माहिती जागतिक प्रवास आणि पर्यटन परिषदेच्या अहवालात देण्यात आली आहे. अहवालानुसार, लोकसंख्याशास्त्रीय आणि संरचनात्मक बदलांकडे लक्ष न दिल्यास या क्षेत्रात ४३ दशलक्षहून अधिक कर्मचाऱ्यांची कमतरता भासू शकते. 'प्रवास आणि पर्यटन कामगार दलाचे भविष्य' या शीर्षकाचा हा अहवाल २० प्रमुख अर्थव्यवस्थांवर लक्ष केंद्रित करतो. 'डब्ल्यूटीटीसी' ही जगभरातील प्रवास आणि पर्यटन उद्योगाशी संबंधित धोरणांवर आणि त्याच्या सामाजिक-आर्थिक योगदानावर काम करणारी संस्था आहे. हा अहवाल रोममध्ये नुकत्याच झालेल्या 'डबल्यूटीटीसी' २५ व्या जागतिक शिखर परिषदेत प्रसिद्ध करण्यात आला. हा अहवाल जगभरात केलेल्या संशोधनावर आधारित आहे. त्यात कंपन्यांचे सर्वेक्षण आणि संस्थेच्या सदस्यांसह आणि प्रमुख भागधारकांच्या मुलाखतींचा समावेश आहे. अहवालानुसार २०२४ मध्ये प्रवास आणि पर्यटन या क्षेत्रांना असलेली मागणी सर्वकालीन उच्चांकावर पोहोचेल. या क्षेत्राचे जीडीपीमधील योगदान ८.५ टक्क्यांनी वाढून १०.९ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स झाले, जे २०१९ च्या पातळीपेक्षा सहा टक्के जास्त आहे. या काळात २०.७ दशलक्ष नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. त्यामुळे एकूण रोजगार ३५७ दशलक्ष झाला.

याच सुमारास भारत पेट्रोकेमिकल्स उद्योगातील पुढचा मोठा खेळाडू बनण्याची तयारी करत असल्याचे पहायला मिळत आहे. 'एस अँड पी ग्लोबल रेटिंग्ज'च्या ताज्या अहवालानुसार हे पाऊल आशियातील विद्यमान पुरवठा असमतोल आणखी वाढवू शकते. भारताची योजना चीनच्या धोरणासारखीच आहे. त्याने आधीच जागतिक बाजारपेठेत आपली पकड मजबूत केली आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा रासायनिक ग्राहक आहे तर भारत तिसरा सर्वात मोठा ग्राहक आहे. दोन्ही देश आता प्लास्टिक, पॅकेजिंग आणि ऑटो पार्टससारख्या दैनंदिन वस्तूंमध्ये वापरल्या जाणाऱ्या रासायनिक उत्पादनांसाठी देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवत आहेत. 'एस अँड पी' क्रेडिट विश्लेषक केर लियांग चान यांच्या मते, भारताची पेट्रोकेमिकल उत्पादन क्षमता चीननंतर आशियाई बाजारपेठेत स्पर्धा तीव्र करेल. अहवालात सूचित केले आहे, की आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत राहील. सध्या आशिया-पॅसिफिक प्रदेश आधीच जास्त क्षमतेचा सामना करत असून भारताची नवी उत्पादन क्षमता परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनवू शकते.

भारताचे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग रिफायनरी विस्तार योजनांमध्ये २५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करत आहेत. सुमारे १२ अब्ज डॉलर्सची खासगी क्षेत्रातील गुंतवणूक काहीशी लवचिक असू शकते. 'एस अँड पी'ने इशारा दिला आहे की हे पाऊल आशियाई निर्यातदारांसाठी आव्हाने वाढवू शकते. त्यांना आता आपल्या विक्रीमध्ये विविधता आणण्याची आणि भांडवली खर्चात सुधारणा करण्याची आवश्यकता असेल. टॅरिफ अडथळ्यांमुळे अमेरिकेसारख्या इतर बाजारपेठांमध्ये हे सोपे होणार नाही. भारताची देशांतर्गत बाजारपेठ मजबूत राहण्याची अपेक्षा आहे. देश लवकरच अमेरिकेला मागे टाकून पॉलीथिनचा जगातील दुसरा सर्वात मोठा ग्राहक बनू शकतो. 'एस अँड पी' विश्लेषक शॉन पार्क यांच्या मते, भारत आणि चीनचे स्वयंपूर्ण होण्याचे उद्दिष्ट उद्योगातील विद्यमान अतिक्षमतेला प्रोत्साहन देत आहेत.

# मच्छिमारांचा विचार होणे गरजेचे

**प्रमोद जाधव**

जीवाची पर्वा न करता, कोळी बांधव खोल समुद्रात मासेमारी करतात. बदलत्या वातावरणाचा त्यांच्या व्यवसायावर कायमच परिणाम होताना दिसत आहे. खोल समुद्रात जाऊनही मासळी अनेकवेळा मिळत नाही. त्यामुळे रिकाम्या हातीच त्यांना परतावे लागत आहे. ऐन मासेमारीच्या हंगामात मासेमारी व्यवसाय करण्यावर बंदी आल्याने मच्छिमार मोठ्या संकटात सापडले आहेत.लहरी हवामान, सततचा पाऊस आणि वादळी वारे यामुळे मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. सरकारने मच्छिमारांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.



रायगड जिल्ह्याला भला मोठा समुद्रकिनारा लाभला आहे. रायगड जिल्हयातील अलिबाग, वरसोली, थळ, मांडवा, रेवस, श्रीवर्धन, बोर्ली, म्हसळा, आग्राव, रेवदंडा, थेरोंडा, मुरूड, राजपूरी अशा अनेक समुद्रकिनारी कोळी बांधव राहत आहे. मासेमारी करून मासळी बाजारात विकण्यापासून ती सुरक्षीत ठेवण्याची कामे कोळी समाज करीत आहे. जून महिना सुरु झाल्यावर दोन महिने मासेमारी बंद होती. एक जून ते ३१ जुलै अशी ६१ दिवसांची पावसाळी मासेमारी बंदी संपुष्टात आल्यानंतर १ ऑगस्टपासून नव्या मासेमारी हंगामाला सुरुवात झाली. नव्या मासेमारी हंगामाला अतिवृष्टी तसेच वादळी वारे यांचा जबरदस्त फटका बसला आहे. हंगामाच्या सुरुवातीला पारंपरिक, रापणकार तसेच ट्रॉलिंग पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना अनपेक्षित नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागल्याने ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक महिने असतानाही खराब हवामानामुळे या दोन महिन्यात मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही. लहरी हवामान, सततचा पाऊस आणि वादळी वारे यामुळे मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. नव्या हंगामात चांगल्या प्रकारे मासेमारी करता येईल, अशी अपेक्षा असतानाच नारळी पौणिमेनंतर अचानक वादळी हवामान आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. बदलत्या वातावरणामुळे मासेमारीत काही दिवसांचा खोळा आला. त्यानंतर पुन्हा मासेमारी सुरु झाली. गौरी-गणपतीच्या काळात वातावरणात झालेल्या अचानक बदलामुळे खराब हवामानामुळे मासेमारीला मोठा फटका बसला. वादळी हवामानामुळे नौका किनाऱ्यावर नांगरून ठेवण्याची वेळ आली. वादळी वाऱ्यामुळे इतर जिल्ह्यातील नौकांना अन्य बंदरांचा आसरा घ्यावा लागला होता. जिल्ह्यातील काही नौकांना इतर बंदरात नांगर टाकावा लागला होता.नवरात्रोत्सव सुरु होताच पुन्हा बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला. शक्ती नावाचे वादळ निर्माण झाले होते. अतिवृष्टी आणि वादळी पावसामुळे हवामान खात्याकडून किनारपट्टीवर रेड अलर्ट जाहीर करण्यात आला होता. मच्छिमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, असा इशारा देण्यात आला होता.

त्यामुळे पुन्हा मासेमारी नौका किनाऱ्यावर ठेवण्याची वेळ मच्छिमारांवर आली. निसर्गाच्या अवकृपेमुळे ऐन मासेमारी हंगामामध्ये मासेमारी ठप्प झाली. त्यामुळे यावर्षी मत्स्योत्पादनातही घट होण्याची शक्यता आहे. मत्स्य दुष्काळाच्या संकटाना मच्छिमारांना सामोरे जाण्याची वेळ येणार आहे. बदलत्या हवामानामुळे मासे मिळण्याचे प्रमाण घटत आहे. हजारों रुपयांचे इंधन खर्च करूनही नौका समुद्रात गेल्यावर मासळी जाळ्यात मिळत नाही. योग्य प्रमाणात मासे मिळत नसल्याने इंधनासह खलाशांचा खर्चही भागत नाही. या परिस्थितीमुळे मच्छिमारांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहण्याची भीती निर्माण झाली आहे. मतलई वाऱ्यामुळे मासेमारी नौका समुद्रात नेणे धोकादायक असते. या वाऱ्यामुळे मासे पकडण्यासाठी जाळी टाकण्यात अनेक अडथळे निर्माण होतात. जाळी टाकल्यावर ती गुरफटली जाते. त्यामुळे मच्छिमारांच्या हाती काहीच लागत नाही. त्याचा काहीही फायदा होत नसून उलट मच्छिमारांना नुकसानाना सामोरे जावे लागते. खलाशांअभावी मासेमारी बंद ठेवावी लागते. डीझेलचा खर्च, बर्फ, खलाशांचा पगार व भत्ता, जाळी व इंजिन दुरुस्ती आदीवर होणारा हजारो रुपयांचा खर्च आणि मासळी विकून मिळणारे तुटपुंजे उत्पन्न याचा ताळेबंदच जुळत नसल्याने मच्छिमार मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. बँकेचे कर्ज, अशा अनेक कारणांमुळे मच्छिमारांची आर्थिक घडी विस्कटली आहे.

लोकसंसद

## मुलांना गड किल्ले बांधण्यास प्रोत्साहन द्या !

गडकोट किल्ले हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा आहे. शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या सवंगडी मावळ्यांच्या पराक्रमांच्या आणि त्यागाच्या खुणा असलेले हे किल्लेच आपले खरे वैभव आहे. प्रत्येक गड किल्यांच्या स्वतंत्र इतिहास असून या प्रत्येक गड किल्ल्याने जसा येथील भूमिपुत्रांचा पराक्रम आणि वैभव अनुभवले आहे, तशा परकीयांकडून दिल्या गेलेल्या हाल अपेष्टाही भोगल्या आहेत. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बारा गडकिलयांचा यंदा यूनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश करण्यात आला आहे ही महाराष्ट्रासह जगभरातील शिवप्रेमींसाठी अभिमानाची बाब आहे. शिवरायांच्या



पराक्रमाची आठवण म्हणून गेल्या काही वर्षांत दिवाळीच्या आधी किल्ले बांधण्याची प्रथा राज्यात सुरु झाली. दिवाळीचा आणि किल्ले बांधण्याच्या प्रथेचा तसा काही संबंध नसला, तरी त्यानिमित्ताने बालमनावर पराक्रमाचे, स्वाभिमानाचे आणि त्यागाचे संस्कार निर्माण होण्यास मदत होते. उभारलेल्या किल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीसह अष्टप्रधान मंडळ आणि मावळे यांच्या प्रतिकृती ठेवल्या जातात ज्या शिवरायांच्या आदर्श राज्यकारभाराची जाणीव करून देतात. त्यामुळे या प्रथेचे जतन करणे आवश्यक आहे; आजमितीला किल्ले बनवण्याची प्रथा राज्यातील काही भागांमध्येच जिवंत असलेली पाहायला मिळते. हल्लीची पिढी ही मैदानी खेळांपेक्षा मोबाईल, टी.व्ही. आणि व्हिडीओ गेम्सच्या दुनियेत हरवणारी आहे. तिला यातून बाहेर काढायचे असेल, तर तिला अशा काही प्रथांची माहिती करून द्यायला हवी. जेणेकरून मुलांच्या कलागुणांना वाव तर मिळेलच शिवाय त्यांच्यामध्ये आपल्या इतिहासाविषयी प्रेम निर्माण होऊन पराक्रमाचे आणि नीतिमत्तेचे संस्कार होण्यास मदत होणार आहे.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

दिनविशेष

# इतिहास संशोधक सेतुमाधव पगडी

सेतुमाधव पगडी हे इतिहास संशोधक, विचारवंत, लेखक, वक्ते, तत्त्वचिंतक, समीक्षक, इतिहासाचे भाष्यकार, कार्यक्षम मुलकी अधिकारी, प्रशासक आणि महाराष्ट्र सरकारच्या 'गॅझेटियर्स'चे संपादक व लेखक होते. त्यांनी यांनी आपली संशोधने पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध केली. त्यांचा जन्म २७ ऑगस्ट १९१० रोजी निलंगा, हैदराबाद राज्यातील (आता महाराष्ट्राचा भाग) जमीनदार ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण गुलबर्गा, उस्मानाबाद आणि पुणे येथे झाले. त्यांनी १९३० मध्ये बनारस हिंदू विद्यापीठातून कला पदवी आणि तीन वर्षांनंतर अलाहाबाद विद्यापीठातून कला पदवी प्राप्त केली.

शिवाजी महाराजांवर लिहिलेले याचे संशोधित पुस्तक आजही प्रमाण मानले जाते. हे पुस्तक नॅशनल बुक ट्रस्ट या नवी दिल्लीतील प्रकाशनाने मराठी भाषेत प्रसिद्ध केले आहे. इतिहासाचे संशोधक म्हणून ख्याती मिळवण्यासोबतच, सेतुमाधव पगडी यांनी विपुल प्रमाणात स्फुट लेखन व ग्रंथलेखन केले. उर्दूचा गाढा अभ्यास असल्यामुळे आशयाला धक्का न लावता इकबालच्या उत्तम व रसभरीत कविता व फिरदौसीचा जाहीरनामा त्यांनी मराठीत आणला. मुंबईत वास्तव्यास असताना पगडी यांनी तेरा वर्षांत किमान तेराशे ग्रंथ अभ्यासले. त्यांच्याकडे आत्मचरित्र लिहिण्याचा आग्रह धरला गेला तेव्हा त्यांनी विविध भाषेतील किमान शंभर आत्मचरित्रे वाचून काढली. इंग्रजी, मराठी, उर्दू, फारसी, बंगाली, अरबी, तेलुगू, कन्नड अशा जवळपास सतरा भाषा त्यांना अवगत होत्या. राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद औरंगाबादेत आले तेव्हा पगडींनी एक तास अस्खलित उर्दूमधून सूफी संप्रदायावर भाषण दिले. ते राष्ट्रपतींना इतके आवडले की, त्यांनी 'अ मोस्ट लर्नेड पर्सन' या शब्दात पगडी यांची प्रशंसा केली. मराठवाडा साहित्य परिषद, इंदूर साहित्य सभा, मराठी वाङ्मय परिषद आदी संस्थांचे अध्यक्षपद सेतुमाधव पगडींनी भूषविले होते. हैदराबाद येथील तेलंगण राज्य मराठी साहित्य परिषदेने 'समग्र सेतुमाधव पगडी' हा ग्रंथ संच प्रसिद्ध केला. सेतु माधवराव पगडी हे १९६० ते १९६९ पर्यंत महाराष्ट्राच्या गॅझेटिअर विभागाचे सचिव होते. इ.स. १९५१ साली औरंगाबाद जिल्ह्याचे कलेक्टर म्हणून त्यांनी काम केले होते. त्यापूर्वी ते हैदराबाद संस्थान मध्ये सनदी अधिकारी होते. गोंडी व कलामी या आदिवासींच्या बोलींवर त्यांनी लिखाण केले. 'जीवनसेतू' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.


या ग्रंथ संचात सेतुमाधव पगडी यांच्या मराठी भाषेतील पुस्तकांचे ५ खंड, तसेच इंग्रजी लेखनाचे २ खंड आहेत. मराठी संचाची दुसरी आवृत्ती मे २०१७ मध्ये काढण्यात आली. 'मराठ्यांच्या इतिहासातील बारीक-सारीक धागेदोरे, मराठा घराण्यांच्या नात्या-गोत्यांचे अनेक तपशील, महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सामाजिक परंपरेमधील अनेक बारकावे यांचा तपशील सेतुमाधव पगडी यांना परिचित असल्यामुळे त्यांच्या अनुवादाला अधिकच भरीवपणा आला आहेफ स.मा. गर्गे यांचा फारसी साधन ग्रंथांच्या अनुवादांविषयीचा उपरोक्त अभिप्राय अनुवाद ग्रंथांचे मोल स्पष्ट करणारा आहे. सुमारे पाच हजार पृष्ठांचा फारसी भाषेतील मजकूर त्यांनी मराठी भाषेत अनुवादित करून इतिहास लेखकांना कायमचे ऋणी करून ठेवले आहे. पगडी यांच्या समग्र लेखनाचे डबल क्राउन आकाराचे ८ खंड सेतू माधव पगडी जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैदराबादद्वारा ऑगस्ट २०१० मध्ये प्रकाशित करण्यात आले. भारत सरकारने १९९१ मध्ये 'पद्मभूषण' पुरस्काराने त्यांचा गौरव केला. मराठवाडा विद्यापीठाने डॉक्टरेट ही मानाची पदवी दिली. पगडी यांच्या जीवनसेतु, छत्रपती शिवाजी या त्यांच्या ग्रंथांना महाराष्ट्र राज्य सरकारचे पुरस्कार मिळाले. अशा या महान लेखकाचे १४ ऑक्टोबर १९९४ रोजी निधन झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१४ ऑक्टोबर**

१) श्रीम. हंसा शरद शेट
अलिबाग, १४-१०-१९४२
२) श्रीम.पुष्पलता गजानन हरवंदे
पिंपळभाट, अलिबाग
१४-१०-१९४४
३) श्रीम.वंदना दत्तात्रेय भोसले
मारूतीनाका, अलिबाग
१४-१०-१०५१

## सुवर्णकण



अध्यात्माच्या गुढ चिंतानात विहार करणारे सुद्धा हरवलेल्या दहा पैशाच्या शोधत मग्न आहेत

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

## आनंद पोवळे यांचे निधन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर (मुळ पाडा) येथील आनंद मल्हार पोवळे (७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (दि.१३) चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक पुत्र, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते भाऊ या नावाने चिरनेर पंचक्रोशीत सुपरिचित होते. चिरनेर परिसरात सर्वांनाच प्रिय होते. त्यांच्या निधनामुळे चिरनेर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



# वृक्षलागवडीकडे दुर्लक्ष

## ● १६ वर्षांत केवळ २० टक्केच वृक्षारोपण



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करताना १०० ते २०० वर्षांपूर्वीच्या वड आणि पिंपळ यासह जांभूळ, आकेशिया अशा सावली देणाऱ्या झाडांची मोठ्या प्रमाणावर तोड झाली. एकेका वृक्षाच्या बदल्यात पाच वृक्ष लावण्याचा नियम आहे. मात्र, गेल्या १६ वर्षांत चौपदरीकरणाचे काम ८५ टक्के पूर्ण झाले असताना वृक्ष लागवडीचा वेग २० टक्क्यांपेक्षाही कमी आहे. त्यामुळे उन्हाळ्यातील प्रवास हा भकास झाला आहे, तर निवाऱ्यासाठी लोकांना प्रतीक्षा करावी लागत आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागांनी लागवडीचे नियोजन केले आहे. त्यामध्ये दुतर्फा ८८ हजार ८१ आणि मध्यभागी ११ हजार ३५२, असे एकूण ९९ हजार ४३३ वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी दुतर्फा ४ हजार २२४ आणि मध्यभागी ४ हजार ९६७, अशी एकूण ९ हजार १९१ वृक्ष लागवड झाली आहे. संपूर्ण जिल्ह्यात ९९ हजार ४३३ रोपांच्या लागवडीचे उद्दिष्ट असून, त्यापैकी केवळ ९ हजार १९१ रोपांची लागवड झाली आहे.

सरासरी १४.२ टक्के कार्यवाही झालेली आहे. वृक्ष लागवडीचे नियोजन पूर्णपणे चुकत आहे. उन्हाळ्यात वृक्ष लागवड करून ती जगवण्यासाठी टँकरने पाणी दिले जाते. सध्या पाऊस परतीच्या मार्गावर आहे, जमिनीत ओलावा आहे. त्यामुळे आता वृक्ष लागवड झाली तर त्या झाडांना अतिरिक्त पाणी देण्याची गरज लागणार नाही. कशेडीपासून परशुराम घाटापर्यंत उन्हाळ्यात वृक्ष लागवड झाली होती. त्याला पुरेसे पाणी मिळाले नाही, त्यामुळे झाडे सुकली. काही झाडे उनाड गुरांनी तोडून टाकली. चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, लांजा, राजापूर दरम्यानही हीच अवस्था आहे. रत्नागिरी–संगमेश्वर या ठिकाणी दुभाजकामध्ये अजूनही वृक्ष लागवड झालेली नाही.

> “मुंबई–गोवा महामार्गावर वृक्ष लागवड करण्यासाठी ठेकेदाराला सूचना केल्या आहेत. सामाजिक वनीकरण विभागाने नर्सरीमध्ये रोपे तयार केली आहेत. लहान झाडे टिकत नाहीत, ती लवकर मरतात. काही झाडे सुकली आहेत, ही वस्तुस्थिती असली तरीही तिथे नव्याने पुन्हा लागवड करण्यात येणार आहे. त्याची कार्यवाही दिवाळीनंतर सुरू होणार आहे. रस्त्याच्या मध्यभागी आणि दुतर्फा लागवड केलेल्या झाडांना पाणी देणे आणि त्यांचे संगोपन करणे ही जबाबदारी ठेकेदाराची आहे. त्यांना सूचनाही देण्यात आल्या आहेत.”
>
> – राजेंद्र कुळकर्णी,
> उपअभियंता,
> सार्वजनिक बांधकाम

## धूळ, उकाड्याने नागरिक त्रस्त

### ● महानगरपालिकेकडून पाणी फवारणी मोहीम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

ऑक्टोबर महिन्याच्या तीव्र उकाड्याने पनवेलकर हैराण झाले आहेत. दिवसेंदिवस वाढत चाललेले तापमान आणि शहरातील सुरू असलेली बांधकामे यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धुरळा पसरत आहे. या धुरक्यामुळे नागरिकांना सर्दी, खोकला, श्वसनाचा त्रास अशा आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेने पुढाकार घेत शहरातील प्रमुख रस्ते, चौक, तसेच बांधकाम क्षेत्राजवळील झाडांवर पाण्याची फवारणी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे हवेतला धुरळा कमी होऊन नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे.



पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून रोज सकाळी आणि संध्याकाळी ही पाणीफवारणी मोहीम राबवली जाणार आहे. नागरिकांनीही बांधकाम स्थळांवर माती झाकून ठेवावी आणि धुरळा नियंत्रणात ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पनवेल शहरात सुरू असलेल्या या मोहिमेमुळे वातावरणात थोडासा गारवा आणि श्वास घ्यायला दिलासा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनकार्यावर व्याख्यान

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

टिळक नगर ज्येष्ठ नागरिक संस्थेची साप्ताहिक सभा शनिवारी (दि.११) संघ अध्यक्ष टिळक नगर शाळेच्या वर्गात आयोजित करण्यात आली होती. ११ऑक्टोबर हा तुकडोजी महाराजांच्या पुण्यतिथीचा दिवस आहे. यानिमित्ताने श्या.गो. पाटील सदस्य फेस्कॉम नियामक मंडळ यांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन व कार्य यावर सभेत भाषण झाले. प्रारंभीच श्या. गो. पाटील यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याची व्याप्ती, तसेच अनेक क्षेत्रात त्यांच्या कार्यकतृत्वाचा पडलेला प्रभाव लक्षात आणून दिला. स्वातंत्र्य लढा, हरिजनांना मंदिर प्रवेश, विनोंबांची भूदान चळवळ, बंगालच्या भीषण दुष्काळात काम, निजामाच्या जुलूमशाही विरुध्द लढा, अंधश्रद्धा निर्मुलन, नवभारत निर्मितीत ग्रामसुधारणेचे महत्व व उद्योग मंदिरे उभारून लोकांना प्रशिक्षण, ग्रंथसंपदा यावर आपले विचार मांडले. त्यांच्या भाषणास उपस्थितांकडून चांगला प्रतिसाद लाभला.



## मुंबई–गोवा महामार्गावर धुक्याची चादर

### वाहतूक मंदावली

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

सोमवारी सकाळी पहाटे पडलेल्या दाट धुक्यामुळे तसेच महामार्गावरील उडणाऱ्या प्रचंड धुरळ्यामुळे संपूर्ण मुंबई–गोवा महामार्ग हरवून गेला होता. जणू काही महामार्गावर धुक्याची चादर पसरली होती. या धुक्यामुळे समोरचे काहीच दिसत नसल्यामुळे महामार्गावरील तसेच आजुबाजूच्या परिसरातील वाहतूक देखील मंदावली होती.



दरम्यान वाहनचालकांना समोरचे काहीच दिसत नसल्यामुळे वाहतूक पुर्णतः धिम्या गतीने सुरू होती. त्यामुळे वाहतुकीसाठी अडथळा सुरु होत होता. त्याचप्रमाणे वातावरणातदेखील मोठ्या प्रमाणात गारवा निर्माण झाला होता. रायगड जिल्ह्यामध्ये देखील सर्वत्र धुके पडल्यामुळे थंडीचे प्रमाण देखील वाढायला सुरूवात झाली आहे. त्यामुळे स्वेटर, ब्लँकेट व चादरीचा वापर देखील मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सोमवारी सकाळी आठ वाजेपर्यंत धुक्याचे प्रमाण एवढे होते की, वाहनचालकांना वाहने चालवताना समोरचे ८ ते ९ फूट अंतरावरील काहीच दिसत नव्हते. त्यामुळे अनेक वाहनचालकांनी आपली वाहने रस्त्याच्या बाजूला उभी करुन ठेवली होती. काही वेळाने धुक्याचे प्रमाण कमी झाल्यानंतर पुन्हा वाहतूक सुरू झाली.

## तरुणाने घेतली कशेळी खाडीत उडी

**। ठाणे । प्रतिनिधी।**

भिवंडी–ठाणे मार्गावरील कशेळी खाडीत एका तरुणाने उडी मारल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अनुराग केसरी (वय २८, कशेळी) असे त्याचे नाव आहे. सोमवारी (दि.१३) सकाळी अनुराग हा कारने कशेळी खाडी पूलावर आला. त्यानंतर त्याने मोबाईल तसेच इतर साहित्य कारमध्ये ठेवले आणि खाडीमध्ये उडी मारली. घटनेची माहिती भिवंडी महापालिका आणि ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना मिळाल्यानंतर अग्निशमन दलाचे जवान, प्रादेशिक आपत्ती व्यवस्थाप कक्षाचे कर्मचारी, नारपोली पोलीस, ठाणे आपत्ती प्रतिसाद दल घटनास्थळी दाखल झाले. पथकांनी त्याचा सुमारे चार तास शोध घेतला. परंतु त्याचा शोध लागू शकला नाही. खाडीत भरतीची वेळ असल्याने पाण्याचा प्रवाह वाढत होता. त्यामुळे नारपोली पोलिसांच्या आदेशानुसार खाडीतील शोधकार्य तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आले.

## दिवसाढवळ्या सोन्याची साखळी चोरीला

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील सी वुड्स सेक्टर ४४ येथील अमित गौतम (४४) काही कामानिमित्त ते बाहेर जाण्यासाठी सव्वानऊच्या सुमारास घराबाहेर पडले. सेक्टर ४४ ए नॅशनल सी क्वीन टॉवर जवळून जाताना त्यांच्या मागून एक दुचाकीस्वार आला. त्याने अमित यांच्या गळ्यातील १ लाख ८० हजार किमतीची सोन्याची साखळी हिसकावून पळून गेला. त्यांनी त्याच्या मागे पळत जाऊन त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र चोरटा दुचाकीवर असल्याने त्याला गाठणे शक्य झाले नाही. ही सर्व घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

## आगीत वीस गाळे जळून खाक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कुर्ला (पश्चिम) येथील सीएसटी मार्गावर ऑटोमोबाईल्सच्या सुट्या भागांचा साठा असलेल्या गाळ्याला आग लागली. ही घटना रविवारी (दि.१२) मध्यरात्री घडली. रात्रभर ही आग विझवण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र पहाटे ही आग आणखीनच भडकल्याने आजूबाजूचे २० गाळे या आगीत जळून खाक झाले. यात कोणीही जखमी झाले नाही. मात्र, मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली आहे.

आगीची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि युद्धपातळीवर आग विझविण्याचे काम हाती घेतले. तसेच, गाळ्यांना लागलेल्या आगीची माहिती मिळताच गाळेधारक, मालकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता.

दरम्यान, ही आग का आणि कशी लागली, आगीचे नेमके कारण काय याबाबत स्थानिक पोलीस, अग्निशमन दलाचे जवान हे अधिक तपास करत आहेत.

## महिला, बालकांचे आरोग्य धोक्यात

### परिचारिकांचा अभाव

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

जव्हार शहर नगरपरिषद हद्दीतील १२ अंगणवाडी केंद्रांवर गर्भवती माता आणि बालकांना होणारे नियमित लसीकरण तसेच आरोग्य तपासणीचे काम परिचारिका नसल्यामुळे गेल्या तीन महिन्यांपासून पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे आदिवासी बहुल भागातील महिलांचे व बालकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून लसीकरण बंद असल्याने गर्भवती माता आणि बालकांचा जीव टांगणीला लागला आहे. त्यामुळे आरोग्य विभागावर सर्वच स्तरांतून नाराजी व्यक्त केली जात आहे.



जव्हार शहरात पूर्वी दरमहिन्याला अंगणवाडी केंद्रांवर वैद्यकीय पथक येऊन गर्भवती मातांची तपासणी आणि बालकांचे वजन करून लसीकरण करीत होते. आवश्यकतेनुसार औषधोपचारही केले जात होते. मात्र मागील तीन महिन्यांपासून परिचारिका नसल्यामुळे हे सर्व काम ठप्प झाले आहे. लसीकरण बंद असलेल्या केंद्रांमध्ये गोरवाडी, हनुमान पॉईंट, नवापाडा, महादेवआळी, जांभूळविहीर, साईनगर बालवाडी, गोखलेनगर, धडगाव, जुनी जव्हार, नवी जव्हार आणि सरस्वतीनगर अशा १२ अंगणवाड्यांचा समावेश आहे. या सर्व ठिकाणी सुमारे ३५० हून अधिक गर्भवती माता आणि ५०० पेक्षा अधिक बालकांचे लसीकरण थांबले आहे. त्यामुळे महिला व बालकांच्या आरोग्य सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### ..आंदोलन छेडणार

परिचारिकांची नियुक्ती करून लसीकरण केंद्रे पुन्हा सुरू करावीत. जर ही लसीकरण केंद्रे तातडीने सुरू झाली नाहीत तर व्यापक प्रमाणात आंदोलन छेडले जाईल, असा इशारा आदिवासी युवा संघाचे अध्यक्ष संदीप माळी यांनी दिला आहे. माळी यांच्या मार्गदर्शनाखाली संघाच्या शिष्टमंडळाने पतंगशहा कुटीर रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय कावळे यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे.

**शेतकरी मीनेश गाडगीळ यांचा नाविन्यपूर्ण प्रयोग** | **एकरी १५०० किलोपर्यंत मिळते उत्पादन**

# गुळसुंदे येथे ‘हिरव्या तांदळा’ची लागवड

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गुळसुंदे, पनवेल येथील कृषीभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी मीनेश गाडगीळ हे नेहमी नाविन्यपूर्ण असे प्रयोग आपल्या शेतात करत असतात. त्यांनी आत्तापर्यंत ब्लॅक बर्मा, लाल, नीळा, जांभळा अशा प्रकारच्या पिग्मेंटेड राईसची आपल्या शेतात लागवड केलेली आहे.

यावर्षी त्यांनी व्हिएतनाम व्हरायटीचा ग्रीन राईस आपल्या गुळसुंदे येथील शेतात लागवड केला आहे. या तांदळात क्लोरोफील कंटेंट जास्त असल्याने या तांदळाला हिरवा रंग प्राप्त होतो. या तांदळाला एक वेगळाच सुवास असतो. या तांदळाची ग्लॅयसेमिक इन्डेक्स कमी आहे. त्यामुळेच डायबेटीक पेशंट हा तांदूळ आपल्या आहारात घेऊ शकतात. ॲन्टी ऑक्सीडन्ट इफेक्ट या तांदळात आढळून येतो.







क्लोरोफील कंटेटमुळे शरीरातील टॉक्सीन न्युट्रल करण्याचा गुणधर्म या तांदळात आहे. साधारण १४० दिवसात तयार होणारे हे वाण आहे. एकरी १५०० किलोपर्यंत याचे उत्पादन मिळते.

मीनेश गाडगीळ यांनी थायलंडवरुन जस्मीन राईस बीयाणे आणले आहे. प्रयोगीक तत्वावर त्यांनी त्याची लागवड केलेली आहे व त्याचे पुढील वर्षासाठी बीयाणे तयार करण्याचे काम त्यांचे चालू आहे.

जस्मीन राईस हा सर्वात सुगंधी तांदूळ म्हणून गणला जातो. पूर्वी रायगडमध्ये बथजीना कोलम नावाचे तांदळाचे पारंपारिक वाण होते. जे सद्ध्या नामशेष झाले आहे. त्याचीही लागवड मीनेश गाडगीळ यानी केलेली असून पुढील हंगामात त्याचे बीयाणे इतर शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न ते करणार आहेत. वरील सर्व बीयाणांचे पारंपारिक पद्धतीत संर्वधन व जतन गाडगीळ यांनी केलेले आहे.

### जमिनीची सुपीकता वाढते

हिरव्या भाताच्या लागवडीमध्ये रासायनिक खतांचा वापर कमी करून मातीची सुपीकता वाढवण्यासाठी हिरव्या खताचा वापर केला जातो. त्यामुळे शेती अधिक पर्यावरणपूरक होते. जमिनीची सुपीकता वाढते आणि मातीमध्ये नैसर्गिकरित्या पोषक तत्वांचे प्रमाण वाढते. तणांची वाढ कमी होते आणि मातीची धूप कमी होते.

## निवडक



### साजगाव ग्रामपंचायत हद्दीत वृक्षारोपण

**खोपोली :** वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जगभर पोहोचवा यासाठी जगद्गुरू रामानंदचार्य श्री नरेंद्र महाराज यांच्या प्रेरणेतून वसुंधरा पदयात्रा सुरू आहे. या उद्देशाने रामानंदाचार्य सांप्रदाय खालापूर आणि साजगांव ग्रामपंचायत यांनी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अंतर्गत पुरातन विठ्ठल मंदीर साजगाव आणि सारसन गावच्या हद्दीत रविवारी (दि.१३) वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे ऑक्सिजन देणारी १०० जंगली झाडे साजगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत लावण्यात आली. श्री स्वामी नरेंद्र महाराज यांच्या जन्मदिनानिमित्ताने लावलेली झाडे १०० टक्के जगविण्याचा ग्रामपंचायतीचा संकल्प असल्याचे साजगाव ग्रामपंचायतीचे सरपंच विनोद खवळे यांनी सांगितले आहे.



### पतसंस्था सभासदांना भेटवस्तू वाटप

**माणगाव :** रायगड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या पतसंस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, उतेखोल, माणगाव या नामांकित पतसंस्थेच्या सभासदांची यावर्षीही दिवाळी गोड होणार आहे. सभासदांना भेटवस्तू वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवारी (दि.१३) सकाळी संस्था कार्यालय चौधरी कॉम्लेक्स, निजामपूर रोड, माणगाव येथे करण्यात आला. यावेळी बामणोली ग्रामपंचायतीचे उपसरपंच मंगेश पवार, जेष्ठ सभासद कुर्मे, चेतन गवाणकर, अन्वर आकुस, संस्थेचे सभासद, कर्मचारी वर्ग, स्वल्पबचत प्रतिनिधी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच, या पतसंस्थेतर्फे रौप्य महोत्सवी वर्षांपासून आपल्या संस्थेतील सभासदांना भेटवस्तू देण्याचा मानस केला आहे. संस्थेच्या सभासदांनी पतसंस्थेच्या कार्यालयात शुक्रवार दि.१७ ऑक्टोबरपर्यंत आपली भेटवस्तू स्वीकारावी, असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे.



### फॅन्सी पणत्यांची ग्राहकांना भुरळ

**रत्नागिरी :** दिवाळीच्या सणामध्ये शहर असो वा ग्रामीण भागात, दारासमोर तसेव अंगणात रांगोळी काढून त्याभोवती पणत्या लावण्यात येतात. त्यामुळे पारंपरिक मातीच्या, चिनीमातीच्या पणत्या बाजारात उपलब्ध आहेत. मात्र, ग्राहकांना सर्वाधिक भुरळ आहे ती फॅन्सी पणत्यांची. बाजारात पणत्यांचे नवनवीन प्रकार उपलब्ध आहेत. आकर्षक रंगसंगतीने, नक्षीकाम करून सजवलेल्या मोहक रंगीत पणत्यांना वाढती मागणी आहे. केवळ घरी वापरण्यासाठी नाही तर भेट देण्यासाठीही पणत्यांची खरेदी केली जात आहे. अंगणातच नाही तर दिवाण–खान्याची शोभा वाढवत असल्याने वेगवेगळ्या आकारातील पणत्या, दिवे, पणत्यांचे स्टँड, लामणदिवे, काचेचे विविध आकारातील आकर्षक फॅन्सी दिवे उपलब्ध असून, खरेदीसाठी ग्राहकांना भुरळ घालत आहेत. ग्रामीण भागात भले मोठे अंगण असले तरी शहरात जागेच्या मर्यादेमुळे फ्लॅट संस्कृतीतही दरवाजासमोरील जेमतेम जागेत रांगोळी काढण्याची हौस भागविली जाते, संस्कृती जपली जाते. प्रवेशद्वाराजवळ एखाद्या नक्षीदार पितळी घंगाळात पाणी भरून त्यामध्ये फुलांच्या पाकळ्या व फ्लोटिंग/तरंगणारे दिवे ठेवल्यास फारच विलोभनीय दिसते. वास्तुशास्त्रातही त्याला महत्त्व असल्याने पणत्यांना वर्षभर मागणी असते. तरंगणाऱ्या, सुवासिक पणत्या, क्रिस्टल पणत्या, दीपमाळेचेही विविध प्रकार उपलब्ध आहेत. दिव्यात तेल घालण्याची कटकट वाचविण्यासाठी मेणाच्या पणत्यांना वाढती मागणी आहे. १०० ते ४०० रुपये डझन दराने विक्री सुरू आहे.

### लहान आकाराच्या माशांच्या विक्रीला बंदी

**मुंबई :** समुद्रात होणाऱ्या बेसुमार मासेमारीमुळे मत्स्य व्यवसाय धोक्यात आला आहे. पूर्ण वाढ होऊ न देता मासे पकडण्यात येत आहेत. यामुळे मासळीचे प्रमाण घटून सागरी जीवसाखळी बिघडू लागली आहे. यासाठी मत्स्यविभागाने लहान आकारांच्या मासे पकडणे आणि त्याची विक्री करणे यावर बंदी घातली आहे. त्यासाठी माशांची वर्गवारी करून त्यांचा किमान आकार (एमएलएस) निश्चित करण्यात आला आहे. विक्रीसाठी लहान मासे आढळल्यास घाऊक आणि किरकोळ विक्रेत्यांना दंड केला जाणार असल्याचे मत्स्यविभागाने जाहीर केले आहे. घाऊक विक्रेत्यांना ५० हजार ते ५ लाखांचा तर किरकोळ विक्रेत्यांना माशांच्या किंमतीच्या ५ पट दंड केला जाणार आहे. लहान मासे म्हणजे अजून प्रजननक्षम न झालेली मासे. त्यांना पकडल्यास ते मोठे होऊन अंडी घालू शकत नाहीत. त्यामुळे भविष्यातील मासळीचे प्रमाण घटते आणि समुद्री जैवसाखळी बिघडते. लहान मासे हे मोठ्या माशांसाठी खाद्य असतात. त्यांची अतिविक्री किंवा पकड झाल्यास संपूर्ण सागरी खाद्यसाखळीवर परिणाम होतो. लहान मासे विकल्याने अल्पकाळ फायदा मिळतो. मात्र पुढील काही हंगामांत मोठे मासे कमी मिळतात. त्यामुळे मत्स्यव्यवसायच घटतो. लहान आकाराचे मासे पकडून विक्री केल्यास दंडाची तरतूद करण्यात आली आहे. बोटीवरील घाऊक विक्रेत्यांकडे ५० टक्क्यांपेक्षा लहान मासे असतील तर पहिल्या वेळेस ५० हजारांचा दंड केला जाईल. दुसऱ्यांदा लहान मासे विकताना आढळला तर २ लाख आणि तिसऱ्यांदा आढळला तर ५ लाखांचा दंड आकारला जाणार आहे. हा नियम किरकोळ मासे विक्रेत्यांनाही लागू आहे. किरकोळ मासळी विक्रेत्यांकडे लहान आकाराचे मासे आढळले तर त्याच्या किमतीच्या ५ पट दंड होऊ शकतो, असे मत्स्यविभागाचे सहाय्यक आयुक्त दिनेश पाटील यांनी सांगितले. मच्छिमार आणि मत्स्यव्यवसाय विभाग दोघांनीही नियमांचे काटेकोर पालन केले, बंद हंगामात पिल्लांची मासेमारी थांबवली तरच माशांचे अस्तित्व टिकेल.

# पंचनामे न करणाऱ्यावर कारवाईची मागणी

## शासनाच्या आदेशाला केराची टोपली; पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील कुंभे येथील भाताची शेती करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र त्या भागातील शेती नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना असलेले तेथील ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. परंतु तेथे कोणी पोहचले नाहीत. शेतकऱ्यांची हि कैफियत किसान क्रांती संघटनेने तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिली. दरम्यान नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे का केले गेले नाहीत अशी विचारणा तहसीलदार डॉ धनंजय जाधव यांनी तलाठी आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना केली आहे.**



कर्जत तालुका आदिवासी भाग म्हणून ओळखला जातो. या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीसाठी शेतकऱ्यांनी पंचनामी करण्याचे आदेश शासनाच्या वतीने कर्जत तहसीलदार डॉ धनंजय जाधव यांनी दिले होते. त्यासाठी तालुक्यातील सर्व २१० महसुली गावातील पंचनाम्यांचा तपशील जाहीर केला आहे. तालुक्यातील प्रत्येक गाव आणि आदिवासी वाडीमध्ये एकतर कृषी सहायक कृषी पर्यवेक्षकांची तर काही ठिकाणी महसूल ग्राम अधिकारी किंवा ग्रामपंचायत अधिकारी यांच्यावर जबाबदारी दिली आहे. मात्र, शासनाच्या या आदेशाचे पालन होताना दिसून येत नाहीत अशी शेतकऱ्यांचो ओरड आहे. यासाठी शेतकरी तलाठी सजा नेरळ येथे जाऊन विचारणा केली असता. तलाठी यांनी उलट उत्तर देत अरे-रावेची भाषा वापरण्यात आली. तसेच आता पंचनामे करून झाले असून सर्व कागदपत्रे आम्ही तहसीलदारांना सादर केली आहेत, असे सांगण्यात आले.

अशाप्रकारे तालुक्यातील अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या अशा समस्या असू शकतात. अनेक शेतकऱ्यांचे पंचनामे न करता त्यांची कागदपत्रे ही सादर केली नसती अशा शेतकऱ्यांना तहसीलदार धनंजय जाधव यांनी तलाठ्यांना सूचना देऊन राहिलेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करून सादर करण्याचे आदेश द्यावे. तसेच तलाठी ग्रामसेवक तसेच कृषी अधिकारी यामध्ये कामचुकारपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

या प्रकरणी किसान क्रांती संघटनेने त्या शेतकऱ्याच्या मदतीसाठी धाव घेत शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाची दखल समाज माध्यमांनी घेतली. त्यांनतर चक्रे फिरली असून कर्जत तहसीलदार डॉ धनंजय जाधव यांनी कामचुकार अधिकारी कर्मचाऱ्यावर आपली वक्रदृष्टी दाखवली आहे.

> **नेरळमधील कुंभे गावातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याने तलाठी सजा नेरळ येथे जाऊन आपल्या नुकसानीचे माहिती सांगितली असता, नाव नंबर लिहून घेतले. त्यानंतर तलाठ्यांनी आम्ही येऊन पंचनामे करू असे निरोप दिला. अनेक दिवस शेतकऱ्यांनी वाट पाहिली परंतु तलाठी पंचनाम्यासाठी आले नाहीत.**
> **–सदानंद शिवराम भोईर शेतकरी, नेरळ–कुंभे**

## निवडक



### नागोठणे परिसरात भातकापणीची लगबग

**नागोठणे :** दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. जवळपास ऑक्टोंबर महिना संपत आला तरी पावसाचा शिडकावा सुरुच होता. परंतु चार ते पाच दिवसांपासून सर्वत्र पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे संपूर्ण रोहा तालुक्यासह नागोठणे परिसरामध्ये शेतकऱ्यांची भातकापणीची लगबग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. परतीच्या पावसाने शेतातील भाताची रोपे ही जमिनीवर आडवी पडुन सर्वत्र विखुरल्यामुळे भातकापणी करतांना मजुरांचे अक्षरशः कंबरडे मोडत आहेत. भातकापणी करतांना शेतामध्ये पुन्हा नव्याने उगवलेले भाताचे कोंब देखिल अडथळे ठरत आहेत. ज्या ठिकाणी भातकापणीसाठी दोन ते तीन दिवस लागायचे त्या ठिकाणी भातकापणी करण्यासाठी आठ ते दहा दिवस लागत आहेत. त्यातच भातकापणीसाठी लागणाऱ्या मजुरांची कमतरता भासत आहे. बहुतांशी आदिवासी मंजुर हे दरवर्षी आप आपल्या शेतीची कामे पुर्ण करुन दुसरीकडे मजुरीसाठी जातात. परंतु यावेळी मात्र यावेळी मात्र उशिरापर्यंत सुरू राहीलेल्या पावसामुळे भातकापणीची कामे ही सर्वांचीच एकदमच निघाल्यामुळे मजुरांची कमतरता मोठ्या प्रमाणात भासत आहे. त्यातुनच जरी मजुरकर मिळाले तरी ५०० ते ६०० रुपये एका माणसाची मजुरी, दोन वेळचे जेवण व चहा पाण्यासाठी आणखी वेगळे पैसे असा मोठ्या प्रमाणात खर्च शेतकऱ्यांना मजुरांवर करावा लागत आहे. त्यामुळे शेतीसाठी लागणारी बी-बीयाणे, मजुरांचा खर्च व परतीच्या पावसाचा बसलेला फटका अशा सर्व गोष्टींचा विचार करता यापुढे शेती करायची की नाही असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे पडला आहे.

### स्त्री शक्ती नोंदणी उपक्रम साजरा

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित महाविद्यालयामध्ये स्त्रीशक्ती नोंदणी उपक्रम (दि. ६) ऑक्टोबर रोजी राबवण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रा. नेहा तुराई, प्रा. स्वप्निल सकपाळ, डॉ. नमिता मोरे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. बी एम खामकर यांचे सहकार्य लाभले.

### मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील लाईनआळी येथे उभी करून ठेवलेली ॲक्टिवा स्कुटीची अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रशांत नरसाळे यांची १५,००० रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची ॲक्टिवा स्कुटी गाडी क्रमांक एम एच ४६ ए ए ५०९८ ही उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



### फणसवाडीत हाय मास्ट प्रकाशित

**पाली/गोमाशी :** महाऊर्जा मुंबई या विभागातून जिल्हा वार्षिक योजनेतून २०२०-२१ या वर्षात मे मस्कॉट इलेक्ट्रॉनिकस कंपनीला अपारंपरिक ऊर्जा विकास लेखाशिर्षातून सोलर हाय मास्ट फणसवाडी येथे बसविण्यात आले होते. गेली कित्येक महिन्यापासून ही सिस्टीम बंद होती. जिल्ह्याचे नेते सुरेश खैरे यांच्या निदर्शनास ग्रामस्थ संतोष शिंगरे यांनी आणून दिले. त्यांतर सुरेश खैरे यांनी पाठपुरावा करून कित्येक महिने नादुरुस्त असणारी सोलर हाय मास्ट सिस्टीम पुन्हा प्रकाशमय करण्यात आली. त्याबद्दल राकेश शिंगरे यांनी मंडळाच्या वतीने सुरेश खैरे यांचे विशेष आभार व्यक्त केले.

### उलवा येथून महिला बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला कोठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार उलवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. हसीना गुलामहसामी पठाण वय ३६ वर्षे, रा. उलवे वर्णन उंची ४ फुट ५ इंच, बांधा सडपातळ, रंगसावळा आहे. या महिले बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने उलवा पोलीस ठाणे किंवा पोहवा विशाल पाटील, मो. नं. ९९८७०६७३८४ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अकाऊंटंट पाहिजे. पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी १० वी पास मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- मुलं, मुली पाहिजेत कामासाठी १० वी १२ वी पास औषधांच्या एजन्सीमध्ये part time सुद्धा चालेल. वेळ : १०.०० am to ७.०० pm
- अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट, गोंधळपाडा, रेवस बायपास परिसरामध्ये २ BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्किंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको एजंटचे स्वागत आहे. मो. ७७५८९७५४०७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## बालकांचे हक्क विषयावर जनजागृतीपर

**। खांब । प्रतिनिधी ।**

जीवनधारा सामाजिक संस्था वरसगाव-कोलाडतर्फे बालकांच्या हक्क या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम करण्यात आला. दि.१२ ऑक्टोबर रोजी जीवनधारा संस्था येथे ३६ आदिवासी वाड्यांमधून पहिली ते बारावीपर्यंतची २०० मुले उपस्थित होती. यावेळी नरेंद्र सोळंके, संतोष शिंदे, हिल्डा फर्नांडिस, पासे व ग्रेसी तसेच संपूर्ण जीवनधारा संस्थेचे कार्यकर्ते उपस्थित होते. संतोष शिंदे यांनी बाल हक्कांची जनजागृती केली व मुलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. बालविवाह याविषयी मार्गदर्शन केले.

नरेंद्र सोळंके व त्यांच्या कुटुंबांनी आलेल्या सर्व मुलांना टी-शर्ट वाटप करून मुलांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. तसेच उपस्थित मुलांनी पारंपारिक नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढविली.





पनवेलच्या भाजी मार्केटमध्ये मातीच्या पणत्या, रांगोळी खरेदी करताना महिला वर्ग.

## महाविद्यालयात संविधानाविषयी जनजागृती

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाची द.ग तटकरे महाविद्यालय माणगाव रायगड राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित ७ ऑक्टोबर रोजी संविधानाविषयी जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी राहुल तळकर उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना संविधान म्हणजे काय, संविधानामध्ये असणारे मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य, घटना निर्मितीमध्ये भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, न्याय, स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता याची शिकवण जगाला देणारे संविधान असे बहुमूल्य मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.




या कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मार्गदर्शन शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना असणाऱ्या शंकांचे निरसन करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. डॉ. बी एम खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. नेहा तुराई, प्रा. स्वप्नील सकपाळ यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सानिया जाधव यांनी केले.

## इक्बाल काझीकडून शाळांना मदत

**पनवेल :** पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल काझी यांनी संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या याकुब बेग हायस्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज पनवेल आणि बारापाडा अँग्लो उर्दू हायस्कुल यांना विविध कामासाठी रक्कम रूपये सतरा लाखांचा धनादेश दिला आहे. याआधीही त्यांनी ३३ लाखांचा धनादेश दिला होता. इक्बाल काझी हे नेहमी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करतात.तसेच कोणताही विद्यार्थी पैशाच्या अभावी शिक्षणापासून वंचित राहू नये आणि शाळेमध्ये घरासारखे वातावरण मिळावे अशी त्यांची अपेक्षा आहे.

## चारिझेन फाऊंडेशनतर्फे शिलाईचे वाटप



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या माणगाव येथील चारिझेन फाऊंडेशनतर्फे महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत शिवणकाम व मेहंदी कोर्स पूर्ण केलेल्यांना फाऊंडेशनतर्फे मंगळवार (दि.७) ऑक्टोबर रोजी गोरगाव येथे फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, फाऊंडेशनचे राकेश पडवळ, किशोर झेमसे, सुजाता इंगळे, अनिता चौधरी, आरीफा पाल यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

माणगाव तालुक्यात या फाऊंडेशनतर्फे महिलांसाठी शिलाई कोर्स, विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप, टिशर्ट वाटप, रक्तदान शिबीर असे विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. या महिलांना आरीफा पाल यांनी प्रशिक्षण दिले.

## विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

**। पाली । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब ऑफ खोपोली या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून व शिक्षक विकास निकम यांच्या प्रयत्नांतून माध्यमिक विद्यालय वाघोशीमधील विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

यावेळी अविनाश राऊत, शैली मेहता, निजामुद्दीन जळगावकर, संगीता पिल्लई, बिंदू शहाजी, अजय पिल्लई, शिल्पा मोदी, तेजस्वी देशमुख, राजेश गोळे यांच्या हस्ते बॅग वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेडगे तर आभार प्रदर्शन गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमास संतोष गायकवाड, विश्वास निकम, मयूर देशमुख, बाबूकाका देशमुख आदींनी मेहनत घेतली.

## मीटर रूममध्ये लागली आग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर सेक्टर ३४ सी नोडमधील ट्रायसिटी सिम्फनी इमारतीच्या मीटर रूममध्ये लागलेली आग सोळाव्या मजल्यापर्यंत पोहोचली. आगीच्या धूरामुळे श्वसनाचा त्रास झालेल्या चार व्यक्तींना खारघरमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

इमारतीमधून धूर येत असल्याची माहिती रहिवासीयांच्या निदर्शनास येताच तत्काळ खारघर अग्निशमन दलाला कळवण्यात आले. डक्टमधून ही आग सोळाव्या मजल्यापर्यंत पोहोचली होती. यावेळी महावितरणकडून तत्काळ वीज पुरवठा खंडित करण्यात आला. तर अग्निशमनच्या कर्मचाऱ्यांनी सीडीच्या मदतीने वरच्या मजल्यावर अडकलेल्या नागरिकांची सुटका केली. दरम्यान यावेळी श्वसनाचा त्रास झालेल्या चार व्यक्तींना तत्काळ खासगी रुग्णालयात नेल्याची माहिती पनवेल महापालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी दिली.



### नैसर्गिक आपत्तीमुळे बागायतदार आर्थिक संकटात | मागील वर्षीची भरपाई जमा न झाल्यामुळे नाराजी

## शेतकऱ्यांना फळपिक विमा काढण्यांचे आवाहन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील आंबा पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी सन २०२५-२६ सालासाठी विमा भरण्याची प्रक्रिया शासनाकडून चालू झालेली आहे. शेतकऱ्यांना मागील नुकसान भरपाई न मिळाली नसून शासनाने पुढील वर्षात होणाऱ्या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी विमा काढण्याची घाई शेतकऱ्यांच्या मागे लावली आहे. यामुळे शेतकरी वर्गामध्ये नाराजीचा सुर उमठत आहे.

अगोदरच शेतकरी नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात सापडला असतांना या शेतकऱ्यांना आणखीन अडचणीत आणण्याचे काम हे सरकार करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होतांना दिसत आहे. शेतकऱ्यांनी सन २०१४-२५ साली आंबा पीक विम्याचे पैसे भरलेले असून त्यांच्या या पिकाचे झालेल्या नुकसानीचे फक्त पंचनामे झाले असले तरी त्यांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई आजतागायत मिळालेली नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला असतांना पुढील वर्षासाठी शेतकऱ्यांने पुन्हा स्वतःच्या खिशातून पैसे भरून विमा काढावा आणि पीक विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणार या अपेक्षेने खिशात असलेल्या पैशाची उधळण करायची का? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.



> **आमच्या आंबा बागेचा मागील वर्षी आंबा पीक विमा उतरविला आहे, त्यावेळी अवकाळी पावसाने आमच्या आंबा पिकाचे नुकसान झाले होते. याबाबत आम्ही तालुका कृषी अधिकाऱ्यांना कळविले होते. तसा नुकसान पिकाचा पंचनामा झाला आहे. मात्र आज पर्यंत पिक विमा कंपन्यांनी नुकसान भरपाई दिलेली नाही.**
> **– मंगेश धामनसे शेतकरी, खानाव–खालापूर**

> **हवामान आधारित पीक विमा योजना अंतर्गत आंबा पिक विम्याचे पैसे १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान बँकेमध्ये जमा होतील. मात्र शेतकरी वर्गांनी आंबा फळपिका विमा काढणे गरजेचे आहे. सदर आंबा पीक विम्याचे पैसे भरण्याची शेवटची तारीख ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत असल्यांचे सांगितले.**
> **–प्रशांत कदम सहाय्यक कृषी अधिकारी खालापूर**

**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**
**जुने सचिवालय, २ रा मजला, फोर्ट, मुंबई - ४०००३२**

क्र. सदस्य (न्यायिक/टेनन्सी/रिव्ही/रायगड/L-४८६/२५
दिनांक १३/१०/२०२५

प्रति,
श्रीम. आशाबाई पांडुरंग जुनघरे ऊर्फ जुनघरा
रा. कसळखंड, पो. सोमटाणे,
ता. पनवेल, जि. रायगड.

**विरुद्ध**

१३. रिजेनसी सुपेरिअर होम्स एल एल पी भागिदारी तर्फे
श्री. दिनेशकुमार मुरलीधर पासेरिया अखत्यारी
श्री. नरेंद्रकुमार कन्हैयालाल रावल
मौजे कसळखंड, ता. पनवेल, जि. रायगड.

**विषय :- सुनावणी नोटीसीबाबत**

वरील नांव धारण करणारा, अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडील क्र. टेनन्सी/कात- ४/अपिल क्र. ४२६/२०२३ दि.०६/०६/२०२५ च्या आदेशाबाबत केलेल्या उपनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी दिनांक ०७/११/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता, सदस्य (न्यायिक) महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

सही/-
**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई**

**सुनावणीचे ठिकाण**
२/-महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.४६३/२०२५

श्री. महादू धर्मा पिंगळा — वादी
मु. दर्यागाव पो. नाडसुर
ता. सुधागड, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी-ग्रामपंचायत पाच्छापुर — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री.महादू धर्मा पिंगळा रा. दर्यागाव पो. नाडसूर ता.सुधागड, जि.रायगड यांनी यांचा मुलगा कु. जयेंद्र महादू पिंगळा याचा जन्म दि. १८/१०/२००९ रोजी मौजे दर्यागाव ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्याच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर जयेंद्र महादू पिंगळा त्याच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :-१३/१०/२०२५

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०३ (तीन) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे डोंगरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| किशोर शिवनाथ हडप | १० | १०/अ/१ | ०-६०-०० | ०-६० |
| दिनेश पंढरीनाथ हांडे | या पैकी विक्री केलेले क्षेत्र हे ० आर २० पॉ ०० मात्र. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-१४/१०/२०२५

## पोलीस अधीक्षक रायगड यांचे कार्यालय

टिळक रोड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग, ता. अलिबाग
जिल्हा-रायगड, दुरध्वनी-०२१४१-२२२०२८/२२८४७३
फॅक्स क्र. ०२१४१-२२८७८९
E-mail :- sp.raigad@mahapolice.gov.in

क्र.पोअरा/३१७/पशा-४/ई.निविदा/स्वच्छता कर्मचारी निविदा/बाह्ययंत्रणा/२०२५, अलिबाग, दि. ०९.१०.२०२५

पोलीस अधीक्षक कार्यालय व पोलीस मुख्यालय येथील स्वच्छता राहण्याच्या दृष्टीने या आस्थापनांचे/कार्यालयांचे अखत्यारीतील इमारतींमधील स्वच्छतागृहे व बाहेरील परिसर स्वच्छतेसाठी ११ महिन्यांसाठी ठेका देण्याकामी ई निविदा करण्यात येत आहे. जाहीर ई-निविदा सुचना सन २०२५-२०२६

**ई-निविदा सादर करावयाचे तपशिलवार वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | कार्यवाहीचे टप्पे | कार्यवाही | वेळ दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिद्ध दिनांक | दि.१३/१०/२०२५ | सकाळी १०.०० वाजता |
| २ | ई-निविदा सादर करणे | दि.१३/१०/२०२५ | सकाळी १०.०५ वाजेपावेतो |
| ३ | ई-निविदापुर्व बैठक | दि.१७/१०/२०२५ | सकाळी १०.०० ते सायं ६.०० वाजेपावेतो |
| ४ | ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.३१/१०/२०२५ | सायंकाळी ६.०० वाजेपावेतो |
| ५ | ई-निविदेतील तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक | दि.०३/११/२०२५ | सकाळी १०.०० वाजता |
| ६ | ई-निविदेतील तांत्रिक लिफाफा उघडण्याचे ठिकाण | दि.०३/११/२०२५ | पोलीस अधीक्षक, कार्यालय- रायगड |

सही/-
**(आँचल दलाल)**
**पोलीस अधीक्षक रायगड-अलिबाग**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

**सूचना क्र. 10, 11, 12/2025-26**

क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक, रत्नागिरी यांच्या वतीने कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) चे क्षेत्रीय यातायात प्रबंधक, रत्नागिरी हे खुल्या (दोन पॅकेट प्रणालीतील) ई-टेंडर प्रक्रियेद्वारे पात्र ठेकेदारांकडून कोकण रेल्वे मार्गाच्या चिपळूण स्थानकावरील फास्ट-फूड स्टॉल (शाकाहारी), चहा स्टॉल आणि खेड स्थानकावरील चहा स्टॉल स्टॉलसाठी ९ वर्षे कालावधीसाठी निविदा मागवीत आहेत. **ठिकाण:-** चिपळूण स्थानकावरील फास्ट-फूड स्टॉल (शाकाहारी), चहा स्टॉल - सर्क्युलेटिंग क्षेत्र, सबवे जवळ, प्लॅटफॉर्म क्र. 03, पश्चिम बाजू. खेड स्थानकावरील चहा स्टॉल - प्लॅटफॉर्म क्र. 01, ट्रेन बोगी स्थान क्रमांक 15-16 किंवा 18-19 दरम्यान. **निविदा क्र.: केआर/आरटीएम/आरएन/सीओएमएल/व्हेज फास्ट-फूड स्टॉल - टीएस/सीएचआय दिनांक: 13/10/2025, निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 13/11/2025 सकाळी 11:00 वाजेपर्यंत, **निविदा उघडण्याची तारीख व वेळ:** 13/11/2025 सकाळी 11:30 वाजता. नोंदणी केल्यानंतर www.ireps.gov.in या संकेतस्थळावरून अर्जदारांना निविदा दस्तावेज मिळवता येतील.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखाली लिहिलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात (यापश्चात **"सदर मालमत्ता"** असे उल्लेखित) मे. हावरे ग्रॅण्डे यांच्या स्पष्ट ाणि आणि विक्रीयोग्य हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

इतर गोष्टींबरोबरच कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण समाविष्ट असलेले सर्व व्यक्ती/संस्था यांचा सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, अभिहस्तांकन, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, देखभाल, वहिवाट, न्यास, भाडेकरू, पोट-भाडेकरू, लिव्ह ॲणअड लायसन्स, काळजीवाहू आधार, भोगवटा, ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करारनामे या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी असल्यास याद्वारे त्याबाबत निम्नस्वाक्षरीकारांना सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात कळविण्याचे सांगण्यात येत आहे, असे न केल्यास असा हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी, जर असल्यास, सोडून दिली आणि/किंवा त्याग केल्याचे समजण्यात येईल आणि असा दावा अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल.

**अनुसूची**
(सदर मालमत्तेचे वर्णन)

पेण, रायगड - ४०२१०७ च्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्हा आणि पेण नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामधील गाव पेण, तालुका पेण, जिल्हा रायगड येथे स्थित जागा सर्व्हे क्र. २५६/ए/१, मोजमाप ४१८० चौ.मी., २५६/ए/२ मोजमाप ५१३० चौ.मी., २३७/१/ए (पूर्वीची २३७/१ + २ए + ४/१) मोजमाप २१५० चौ.मी., २३७/२/ए/३ मोजमाप ३२१० चौ.मी. आणि २३७/२/ए/४ मोजमाप १५६० चौ.मी., एकत्रितरित्या मोजमाप अदमासे १६,२३० चौ.मी.चे सर्व खंड आणि तुकडे.

**दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५**
सही/-
**निरव सी. जानी,** भागीदार
**जानी ॲण्ड परीख** करिता
**ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स**
३११, दलामल टॉवर, २११, फ्री प्रेस जर्नल मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
ईमेल: nirav@janiparikh.in

**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात**
**कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये पोट-कलम ३२ ग अन्वये द्यावयाची नोटीस**

**नोटीस** — दावा क्रमांक ०६/२०२५

१.श्री.गजानन शंकर ठोंबरे
२.श्री.रमेश शंकर ठोंबरे
३.श्रीम.सुचिता सुरेश ठोंबरे
४.श्री.संतोष सुरेश ठोंबरे — वादी/अर्जदार
५.श्री.संजय सुरेश ठोंबरे
६.श्रीम.सरिता जितेंद्र म्हात्रे
७.श्रीम.शांताबाई शंकर ठोंबरे,
सर्व राहणार मिळकतखार, पो.सारळ
ता.अलिबाग, जि.रायगड

विरूद्ध

श्रीम.सरस्वती गजानन वैद्य
रा.मिळकतखार,पो.सारळ, — प्रतिवादी/सामनेवाला
ता.अलिबाग जि.रायगड

**विषय :** मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| मौजे मिळकतखार ता.अलिबाग | १५४ (जुना ११६/२अ) | ०-१२-९० पो.ख.०-००-०० एकूण ०-१२-९० | १.९४ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि.११/०६/२०२५ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारीख ०७/११/२०२५ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमिन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरून फर्मावित आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरूवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न राहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०७/१०/२०२५

सही/-
**(विक्रम पाटील)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**अलिबाग-रायगड**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) कार्तिक नारायण नायडू, २) गायत्री कार्तिक नायडू, ३) सदानंद कार्तिक नायडू, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| देवघर ता.अलिबाग | २१८/२ | ०-६९-०० | ६.५० |
| देवघर ता.अलिबाग | २१६ | क्षेत्र ०-३७-३० पो.ख. ०-०५-२० एकूण क्षेत्र ०-४२-५० | ६.२७ |

वर नमुद मिळकतींपैकी विद्यमान मालक १) कार्तिक नारायण नायडू, २) गायत्री कार्तिक नायडू, (३) सदानंद कार्तिक नायडू यांच्या नावे असलेले एकूण क्षेत्र १-११-५० हे. आर., इतक्या क्षेत्राबाबतचे

दिनांक : १३/१०/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## उपविभागीय अधिकारी सुधागड, जि. रायगड यांच्या न्यायालयात
**जाहीर नोटीस**

आर.टी.एस.विलंबमाफी अपिल नं.१०५/२०२५

१) प्रभातचंद्र सवाईलाल जैन
रा. आनंददर्शन, घर क्र.७१, अभिनव नगर
कॉ.सोसायटी, बोरीवली पश्चिम, मुंबई ४०००६६ — अपिलार्थी
२) हर्ष पुजालाल दवे
रा.४ निळकंठ पार्क, राजावाडी गार्डन
घाटकोपर पूर्व नं.२ स्वतः करीता नं.१ तर्फे अखत्यारी

विरुद्ध

१) तलाठी सजा वावळोली
२) मंडळ अधिकारी नांदगाव — उत्तरार्थी
३) प्रदीप पंढरीनाथ पाटील
मु.पो.गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड

सर्व संबंधितांना या नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी या न्यायालयात मौजे भार्जे, ता. सुधागड येथील गट नं. ४६६, ४६८, ४८४, ४८५, ४८६, ४९२ या मिळकतीमधील फेरफार क्र. ४९० च्या विरोधात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये या कार्यालयात अपिल दाखल केले आहे.

सबब या नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की, या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी संबंधितांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, सुधागड येथे आमचे कार्यालयात सकाळी १२-०० वाजता आपण स्वतः वा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमूद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे दि.१३/१०/२०२५

सही/-
**(सायली ठाकूर)**
**उपविभागीय अधिकारी सुधागड**
**उपविभाग रोहा**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेला याद्वारे कळविण्यात येते की माझे अशिल खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत नोंदणीकृत खरेदीखताद्वारे (१) शकुंतला नारायण शेडगे, (२) विमल नारायण शेडगे, (३) पुष्पलता पुंडलिक पवार, (४) सुलोचना नथुराम शेडगे, (५) दत्ताराम नथुराम शेडगे, (६) विजय नथुराम शेडगे, (७) शोभा नथुराम शेडगे, (८) सुनिता नथुराम शेडगे, (९) सुनंदा श्रावण शेडगे, (१०) अनिता श्रावण शेडगे, (११) सरिता श्रावण शेडगे, (१२) सुनिल श्रावण शेडगे, (१३) प्रगती राजेंद्र धाडवे यांच्याकडून खरेदी करून घेणार आहे.

**सदरील जमीन मिळकतीची तपशील**

| मालमत्तेचा प्रकार | स्थान | गॅट क्र. | प्रॉपर्टी युनिक आयडेंटिफिकेशन (PU-ID) | क्षेत्र | मालकी |
|---|---|---|---|---|---|
| शेतीयोग्य जमीन | गाव कुंभारते (गाव कोड: ५५४५६८), तालुका माणगाव, जिल्हा रायगड, महाराष्ट्र | ७२/२/ब | १५३४१७०२३९४ | अंदाजे ११९ गुंठे | ७/१२ उताऱ्यानुसार आणि संबंधित महसूल नोंदीनुसार |

तमाम जनतेला कळविण्यात येते की, सदरील जमीन मिळकतीवर होणाऱ्या करारांबद्दल जर कुणाला कसलीही हरकत असेल तर २१ दिवसांचा कालावधीत खालील दिलेल्या माहितीवर संपर्क साधावे.

**ॲड. सदानंद द.देसाई**
मो. ९७६९४०९३२४
ई मेल: advsadananddesai@gmail.com
पत्ता: शांतीनगर, सेक्टर-९, बी-२७/२०३,
मिरा रोड (पूर्व), ठाणे-४०११०७.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे थळ, ता.अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक मोनिका समीर खळे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| थळ ता.अलिबाग | १२०/६ | ८.६०.०० | ८६.०० |

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहिवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १३/१०/२०२५
मोबा. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालक श्री.आशिष शरद जगे व श्री.श्रीनाथ अशोक पाटील यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतींमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पाल्हे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १९९ | २३-८०-०० | ४७६.०० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदी व्यवहाराची बोलणी पुर्ण करुन खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १२/१०/२०२५

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.अलिबाग,
जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-सहाण, ता.अलिबाग, जि.रायगड, येथील गट नंबर ३९९, क्षेत्र ०-१३-६० हे.आर., पो.ख.०-०१-३० हे. आर., एकूण क्षेत्र ०-१४-९० हे.आर, आकार ३.६९ रू.पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री.सुधाकर शांताराम वर्तक रा. रामेश्वर पेठ, चौल, ता.अलिबाग, जि. रायगड. २) श्री.सुरेश शांताराम वर्तक रा.वाळंज पारोडा, नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड. ३) श्री. अजित शांताराम वर्तक रा.वाळंज पारोडा, नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड. ४) श्री.अरविंद मधुसुदन वर्तक रा.ए ५४, इंद्रायणी कॉम्प्लेक्स, २४, जे.के.सावंत मार्ग, शिवाजी मंदिर जवळ, दादर मुंबई ४०००२८ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १३/१०/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे भातसई, ता. रोहा, जि. रायगड येथील**

| मालकाचे नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री.प्रविण जनार्दन खरिवले व इतर | ४०२ | वरकस ००-७८-०० पो.ख. ००-९२-०० एकुण ०३-७०-०० | २.४४ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. १२/१०/२०२५

सही
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा.फ्लॅट नं.४०२, बी-विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे डॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि.
रायगड पिन नं. ४०२१०९ मोबा नं.९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस
**अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात**

सविता गजानन पाटील ऊर्फ — .अपिलार्थी
सविता राघो पाटील

**विरुद्ध**

प्रशांत कृष्णा पाटील — ... उत्तरार्थी

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसमध्ये वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात विलंब माफी अर्ज क्र.३७/२०२५ दाखल केले आहे.

| गावाचे नांव | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे पेझारी, | २९/५/ब | ०-३२-०० | ४.३० |
| ता.अलिबाग | ३१/१/अ/१ | ०-११-०० | ०.८१ |

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

**उत्तरार्थीचे नाव :**
१. श्री.प्रशांत कृष्णा पाटील, — उत्तरार्थी...
२. लिना विलास पाटील,
३. पल्लवी तुषार पाटील,
४. चित्रा सुभाष दळवी,
क्र.१ ते ४ रा. कृष्ण भवन, सेक्टर १२, रुम नं.१०३, प्लॉट नं. १२/१४, रोड नं.१, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
५. तारा हरिश्चंद्र पाटील.
६. संतोष हरिश्चंद्र पाटील,
७. मंगेश हरिश्चंद्र पाटील,
८. वनिता संजय पाटील,
क्र. ५ ते ८ रा. पेझारी, ता.अलिबाग, जि.रायगड
९. प्रज्वला प्रविण म्हात्रे,
१०. उज्वला विनायक पाटील,
११. शिवंजली विनायक पाटील,
क्र.९ ते ११ रा. साई सुंदर नगर, साईदत्त बिल्डींग नं.१२, रुम नं.१००९, सदानंद तांडेल मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५
१२. अनुसया राम उर्फ रामचंद्र पाटील,
रा.भाकरवड, पो.पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड
१३. सुनिता प्रभाकर पाटील,
रा. लाधीवाला चाळ, ९८- ए. रुम नं.८, ओल्ड प्रभादेवी रोड, प्रभादेवी मुंबई ४०००२५
१४. तहसिलदार अलिबाग,
१५. मंडळ अधिकारी चरी,
१६. तलाठी सजा पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि.१५/१०/२०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
**(मुकेश चव्हाण)**
**उपविभागीय अधिकारी**
**अलिबाग उपविभाग अलिबाग**

# निवडक

## ऑस्ट्रेलियासाठी रोहित-विराटच पुरेसे!

**मुंबई :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ३ सामन्यांची वनडे मालिका आणि त्यानंतर ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाणार आहे. वनडे मालिकेसाठी टीम इंडियामध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचीही निवड करण्यात आली आहे. हे दोन्ही खेळाडू जवळपास ७ महिन्यांनंतर भारतासाठी क्रिकेट खेळताना दिसणार आहेत. बराच काळानंतर हे दोन भारतीय दिग्गज एकत्र मैदानात उतरणार असल्याने चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर वनडे स्वरूपात रोहित आणि विराट यांची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे. कांगारूंना सामोरे जाण्यासाठी हे दोघेच पुरेसे आहेत, असे आम्ही नाही म्हणत, तर आकडेच त्याची साक्ष देत आहेत. ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर वनडे क्रिकेटमध्ये रोहित आणि विराट यांचा खेळ अतिशय शानदार राहिला आहे. रोहितने आतापर्यंत कांगारूंच्या मैदानावर १९ वनडे सामने खेळले आहेत. या काळात हिटमॅनने ५८.२३ च्या सरासरीने ९९० धावा केल्या आहेत. त्याच्या बॅटमधून ४ शतके आणि २ अर्धशतके झळकली आहेत. त्याचा स्ट्राईक रेट ९०.९९ असा प्रभावी राहिला आहे. कोहलीच्या आकडेवारीकडे पाहिल्यास, त्याने आतापर्यंत १८ सामने खेळले आहेत. या काळात त्याने ४७.१७ च्या सरासरीने ८०२ धावा केल्या आहेत. त्याच्या बॅटमधून ३ शतके आणि ४ अर्धशतके झळकली आहेत. विराटने ८८.७१ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली आहे.




## महिला विश्वचषकात भारताचा पराभव

**नवी दिल्ली :** महिला एकदिवसीय विश्वचषकात यजमान भारताचा सलग दुसरा पराभव झाला. दक्षिण आफ्रिकेला पराभूत केल्यानंतर, भारतीय महिला संघाचा गतविजेत्या ऑस्ट्रेलियाकडून तीन विकेट्सने पराभव झाला. रविवारी विशाखापट्टणम येथे भारताने ३३० धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने ४९ षटकांत सात विकेट्स गमावून लक्ष्य गाठले. ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीने १४२ धावांची सामना जिंकणारी खेळी खेळली. एलिस पेरीने अखेर ४७ धावांची खेळी करत विजय निश्चित केला. गोलंदाजीत ॲनाबेल सदरलँडने फक्त ४० धावांत पाच विकेट्स घेतल्या. भारताकडून स्मृती मंधाना यांनी ८० आणि प्रतिका रावल यांनी ७५ धावा केल्या. श्रीचरणीने तीन विकेट्स घेतल्या. दीप्ती शर्मा आणि अमनजोत कौर यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. महिला एकदिवसीय इतिहासात ऑस्ट्रेलियाने सर्वाधिक लक्ष्याचा पाठलाग केला. संघाने २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ३०५ धावा करणाऱ्या श्रीलंकेचा विक्रम मोडला. हा भारताविरुद्ध कोणत्याही संघाने केलेल्या सर्वाधिक धावांचा पाठलाग आहे. ऑस्ट्रेलियाला शेवटच्या दोन षटकांमध्ये १३ धावांची आवश्यकता होती. स्नेह राणा ४९ व्या षटकात गोलंदाजी करण्यासाठी आली. तिने पहिल्या पाच चेंडूंमध्ये ७ धावा दिल्या. शेवटच्या चेंडूवर एलिस पेरी पुढे सरकली आणि षटकार मारला, ज्यामुळे संघाला तीन विकेटने विजय मिळाला. पेरीने ५२ चेंडूत ४७ धावा केल्या.एलिस पेरी १६ धावा काढल्यानंतर रिटायर्ड हर्ट झाली होती. सहा विकेट पडल्यानंतर ती फलंदाजीला परतली. तिने खालच्या फळीतील फलंदाजांसह डावाची सूत्रे सांभाळली आणि सहा चेंडू शिल्लक असताना संघाला विजय मिळवून दिला.

## टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनची बाजी

**नवी दिल्ली :** प्रो कबड्डी लीग स्पर्धेतील ७९ वा सामना पुणेरी पलटन आणि दबंग दिल्ली या दोन्ही संघांमध्ये पार पडला. गेल्यावेळी हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. त्यावेळी गोल्डन रेडने निकाल लागला होता. या सामन्याचा निकाल हा टायब्रेकरने लागला. सामना बरोबरीत सुटल्यानंतर टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनने बाजी मारली. या सामन्यात पुणेरी पलटनकडून पहिली चढाई करण्यासाठी अस्लम इनामदार चढाईला आला. पण पहिल्याच चढाईत त्याची पकड झाली. यासह दबंग दिल्लीने आपलं खातं उघडलं. त्यानंतर पंकज मोहितेने चढाईत १ गुण घेत पुणेरी पलटनला खातं उघडून दिलं. सुरुवातीच्या १० मिनिटात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत रंगली. सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ १४-१० गुणांनी आघाडीवर होता. पहिल्या टप्प्यात पिछाडीवर राहिलेल्या दबंग दिल्लीने पुढील १० मिनिटात पुनरागमन करण्यासाठी पूर्ण जोर लावला. १६ व्या मिनिटाला पुणेरी पलटनवर ऑलआऊटचं संकट ओढावलं होतं. १७ व्या मिनिटाला पुणेरी पलटनचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झालं यासह १९-१७ सह दबंग दिल्लीने पिछाडी २ गुणांवर आणली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दबंग दिल्लीने आघाडी घेतली. उत्तरार्धातील दुसऱ्याच मिनिटाला बोनस घेत पुणेरी पलटनने दोन्ही संघांचे गुण बरोबरीत आणले. दबंग दिल्लीकडून अजिंक्य पवारने आपलं सुपर १० पूर्ण केलं. सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दबंग दिल्लीकडे ५ गुणांची आघाडी होती. उत्तरार्धातील १० मिनिटांचा झाल्यानंतर दबंग दिल्लीने आपली आघाडी कायम ठेवली. दबंग दिल्लीचा संघ ५ गुणांनी आघाडीवर होता.

# मिशन दिल्ली केवळ ५८ धावा दूर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

दिल्ली कसोटी जिंकण्यापासून भारतीय संघ ५८ धावा दूर आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध १२१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संघाने एका विकेटच्या मोबदल्यात ६३ धावा केल्या आहेत. चौथ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा केएल राहुल २५ आणि साई सुदर्शन ३० धावांवर नाबाद आहेत. दोघांनीही आधीच अर्धशतकी भागीदारी केली आहे. यशस्वी जयस्वाल ८ धावा करून बाद झाला.

फॉलोऑन खेळणाऱ्या वेस्ट इंडिज दुसऱ्या डावात ३९० धावांवर सर्वबाद झाला. जस्टिन ग्रीव्हज (५० धावा) आणि जेडेन सील्स (३२ धावा) यांनी ११३ चेंडूत १० व्या विकेटसाठी ७९ धावांची भागीदारी केली. एका क्षणी, वेस्ट इंडिजचा डाव पराभवाच्या धोक्यात होता.




■ राहुल-सुदर्शन नाबाद परतले
■ वेस्ट इंडिजकडून १२१ धावांचे लक्ष्य

जॉन कॅम्पबेल (११५ धावा) आणि शाई होप (१०३ धावा) यांनी शतके झळकावून डावाचा पराभव टाळला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १७७ धावांची भागीदारी केली.

बुमराह आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले. मोहम्मद सिराजने दोन बळी घेतले. रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, वेस्ट इंडिजचा पहिला डाव २४८ धावांवर संपला. भारताने त्यांचा पहिला डाव ५१८/५ वर घोषित केला.

## जडेजाने मोडला हरभजनचा विक्रम!

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात रवींद्र जडेजाने अप्रतिम गोलंदाजी केली.त्याला फलंदाजीची संधी मिळाली नाही. पण गोलंदाजीत त्याने दमदार खेळ करत मोठा विक्रम आपल्या नावावर केला. जड्डूने हरभजन सिंगचा मोठा विक्रम मोडीत काढला आहे. आता त्याने अनिल कुंबळे आणि आर. अश्विन यांच्या क्लबमध्ये प्रवेश केला आहे.

जडेजा आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतासाठी घरच्या मैदानावर सर्वाधिक बळी घेणारा तिसरा गोलंदाज ठरला आहे. या बाबतीत त्याने हरभजन सिंगला मागे टाकले आहे, ज्याने ३७६ बळी घेतले होते. पण आता जड्डू ३७७ बळींसह तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. या यादीत पहिल्या क्रमांकावर अनिल कुंबळे आहेत, ज्यांनी ४७६ बळी घेतले आहेत. तर आर. अश्विन ४७५ बळींसह दुसऱ्या स्थानावर आहेत. जडेजाने वेस्ट इंडिजचा सलामी फलंदाज जॉन कॅम्पबेलला बाद करून ही कामगिरी साध्य केली. कॅम्पबेलने या सामन्यात ११५ धावांची खेळी केली होती. धडाकेबाज फॉर्मात दिसत असलेल्या कॅम्पबेलला जडेजाने पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.पहिल्या डावात रवींद्र जडेजाने १९ षटकांची गोलंदाजी करत ३ फलंदाजांना बाद केले. याशिवाय दुसऱ्या डावात तो आत्तापर्यंत फक्त एकच बळी घेऊ शकला आहे. अशा प्रकारे जडेजाने दोन्ही डाव मिळून आतापर्यंत एकूण ४ बळी घेतले आहेत.



## महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा
# स्मृती मंधानाने रचला बाबर आझमसारखा विक्रम

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

वुमन्स वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत टीम इंडियाकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. मात्र सलग दोन सामन्यात पराभवाचं तोंड पाहिल्यानंतर आता क्रीडाप्रेमींच्या मनात धाकधूक वाढली आहे. असं असताना स्मृती मंधानाने एक विक्रम आपल्या नावावर केला आहे. बाबर आझमने दोन वर्षापूर्वी असा विक्रम प्रस्थापित केला होता.

स्मृती मंधानाने बाबर आझमसारखा विक्रम रचला म्हणजे नेमकं काय केलं? असा प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही. स्मृती मंधानाने वनडे क्रिकेटमध्ये वेगाने ५००० धावांचा पल्ला गाठला आहे. बाबर आझमने अशीच कामगिरी मेन्स वनडे क्रिकेटमध्ये केली आहे. आता महिला क्रिकेटमध्ये हा कारनामा स्मृती मंधानाच्या नावावर झाला आहे.

क्रिकेटमध्ये वनडे क्रिकेटमध्ये कमी डावात ५००० धावा करण्याचा विक्रम बाबर आझमच्या नावावर आहे. त्याने ९७ डावात ही कामगिरी केली होती. बाबर आझमने ५ मे २०२३ रोजी न्यूझीलंडविरुद्ध खेळताना चौथ्या वनडे सामन्यात या विक्रमला गवसणी घातली होती. आता दोन वर्षांनी स्मृती मंधानाने हा विक्रम वुमन्स क्रिकेटमध्ये रचला आहे. तिने ११२ डावात वेगाने ५००० धावा पूर्ण केल्या आहेत. स्मृती मंधानाने ही कामगिरी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात केली. स्मृती मंधानाने ६६ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकार मारत ८० धावांची खेळी केली. यासह तिने हा विक्रम आपल्या नावावर केला होता. मेन्स आणि वुमेन्स वनडे क्रिकेटमध्ये स्मृती मंधाना, बाबर आझम आणि हाशिम अमला यांनी वेगाने ५००० धावा केल्या आहेत. या तिघांचं नाव टॉप ३ फलंदाजांमध्ये येते.




## वैभव सूर्यवंशी बिहार रणजी संघाचा उपकर्णधार

**| बिहार | वृत्तसंस्था |**




१५ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या २०२५-२६ रणजी ट्रॉफी हंगामासाठी वैभव सूर्यवंशीची बिहार संघाचा उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संघाचे नेतृत्व फलंदाज साकिबुल गनी करणार आहे. ही घोषणा या हंगामातील रणजी ट्रॉफीच्या पहिल्या दोन फेऱ्यांसाठी आहे. पुढील वर्षाच्या सुरुवातीला अंडर-१९ विश्वचषक होणार असल्याने, वैभव संपूर्ण हंगामात खेळू शकेल अशी शक्यता कमी आहे.

१४ वर्षीय वैभवने भारतीय अंडर-१९ संघाकडून खेळताना इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियामध्ये शतके झळकावली आहेत. अलिकडेच, भारताच्या अंडर-१९ ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान, वैभवने ब्रिस्बेन येथे झालेल्या पहिल्या युवा कसोटीत ७८ चेंडूत शतक झळकावले. ऑस्ट्रेलियातील बहु-दिवसीय मालिकेत तो दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता, त्याने तीन डावांमध्ये एकूण १३३ धावा केल्या. भारताने मालिका २-० ने जिंकली.




## अफगाणिस्तानचा बांगलादेशवर ८१ धावांनी विजय

**| अफगाणिस्तान | वृत्तसंस्था |**

अफगाणिस्तान क्रिकेट संघाने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात बांगलादेशचा ८१ धावांनी पराभव करत तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २-० अशी जिंकली.

संघाने ४४.५ षटकांत १९० धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ २८.३ षटकांत १०९ धावांवर सर्वबाद झाला. अफगाणिस्तानचा सलामीवीर इब्राहिम झद्रानने ९५ धावा केल्या आणि त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना १४ ऑक्टोबर रोजी अबू धाबी येथे खेळला जाईल.प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानची सुरुवात संथ झाली, परंतु सलामीवीर इब्राहिम झद्रानने संघाची धुरा सांभाळली. त्याने १४० चेंडूत ९५ धावा केल्या. मोहम्मद नबी आणि एएम गझनफर यांनी प्रत्येकी २२ धावांचे योगदान दिले. तथापि, उर्वरित फलंदाज फारसे काही करू शकले नाहीत आणि संघ ४४.५ षटकांत १९० धावांवरच बाद झाला.बांगलादेशकडून मेहदी हसन मिराजने सर्वाधिक विकेट घेतल्या. त्याने १० षटकांत ४२ धावा देत तीन विकेट घेतल्या. रिशाद हुसेन आणि तन्झिम हसन साकिब यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.

## सलमान इकबालवर आजीवन बंदी

**इस्लामाबाद :** पाकिस्तानचा भालाफेकपटू अरशद नदीमच्या खराब कामगिरीनंतर नदीमचे प्रशिक्षक आणि पंजाब ॲथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष सलमान इकबाल यांच्यावर पाकिस्तान ॲमेच्युअर ॲथलेटिक्स फेडरेशनने आजीवन बंदी घातली आहे. असोसिएशनच्या घटनेचे उल्लंघन करून निवडणूक घेतल्याचा आरोप करत ही कारवाई करण्यात आली.

## संघाला जिंकवलं, मात्र जीव गमावला!

**| मुरादाबाद | वृत्तसंस्था |**

उत्तर प्रदेशातील मुरादाबाद जिल्ह्यातील क्रिकेट सामन्यात वरिष्ठ गोलंदाज अहमर खानने संघाला विजय मिळवून दिल्यानंतर जीव गमावला. त्याने शेवटचा चेंडू टाकल्यानंतर तो अचानक मैदानात कोसळला होता. या घटनेने क्रिकेट जगतात हळहळ व्यक्त केली जात आहे. रविवारी एक वरिष्ठ गोलंदाज त्याच्या संघाला जिंकवून दिल्यानंतर अचानक मैदानावर कोसळला आणि त्याने काही क्षणात जीव गमावला.

नुकतीच उत्तर प्रदेश वेटरन्स क्रिकेट असोसिएशनने एक सामना अयोजित केला होता, ज्यात मुरादाबाद आणि संभालमधून संघ सहभागी झाले होते. संभालला शेवटच्या ४ चेंडूत १४ धावांची गरज होती. पण डावखुरा वेगवान गोलंदाज असलेल्या अहमरने मुरादाबाकडून गोलंदाजी करताना शानदार गोलंदाजी केली आणि संघाला ११ धावांनी विजय मिळवून दिल होता. दरम्यान, शेवटचा चेंडू त्याने टाकल्यानंतर अहमर अचानक मैदानात कोसळला आणि त्यानंतर त्याला हॉस्पिटलमध्ये नेईपर्यंत त्याने जीव गमावला होता. ही घटना या सामन्याचे शूट करणाऱ्या व्यक्तीच्या फोनच्या कॅमेऱ्यात कैद झाली आहे. इंडिया टूडेने दिलेल्या वृत्तानुसार तेथील प्रत्यक्षदर्शींने सांगितले की अहमरला श्वास घेताना त्रास होत असल्याचे दिसले, ज्यानंतर तो खेळपट्टीवर खाली बसला आणि काही क्षणात अचानक खाली कोसळला.

# रोहित शर्मा विश्वविक्रमाच्या उंबरठ्यावर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताचा सलामीवीर रोहित शर्मा युनिव्हर्स बॉस बनण्याच्या जवळ आहे. तो एक ऐतिहासिक विश्वविक्रम रचण्याच्या उंबरठ्यावर आहे. १९ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत रोहित शर्मा ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळेल तेव्हा तो एका विश्वविक्रमाचे लक्ष्य ठेवेल.

जर रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत आणखी आठ षटकार मारले तर तो एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विश्वविक्रम करेल.

रोहित शर्मा माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदीला मागे टाकून एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज बनेल. ज्याप्रमाणे वेस्ट इंडिजचा दिग्गज फलंदाज ख्रिस गेलला टी-२० क्रिकेटमध्ये त्याच्या प्रचंड यशासाठी चाहते युनिव्हर्स बॉस म्हणून संबोधतात, त्याचप्रमाणे हिटमॅन रोहित शर्मा आता त्या गटात सामील होणार आहे.

रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत जर त्याने किमान १०० षटकार मारले तर तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये १०० षटकार मारू शकेल. जर त्याने १२ षटकार मारले तर तो इतिहास रचेल.

## जागतिक ज्युनियर बॅडमिंटन स्पर्धा | भारतीय खेळाडूंकडून पदकाची आशा
# ऐतिहासिक ब्राँझनंतर आता वैयक्तिक प्रकारावर लक्ष

**| गुवाहाटी | वृत्तसंस्था |**

भारतीय खेळाडूंनी जागतिक ज्युनियर बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेतील मिश्र प्रकारामध्ये ऐतिहासिक ब्राँझपदक पटकावल्यानंतर आता सुरू होत असलेल्या वैयक्तिक प्रकारामध्येही भारतीय खेळाडूंकडून पदकाची आशा बाळगली जात आहे.

भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी १७ वर्षांपूर्वी पुण्यात झाली होती, जेव्हा सायना नेहवालने मुलींच्या एकेरीत सुवर्णपदक जिंकले. तसेच आर.एम.व्ही. गुरुसाई




दत्तने मुलांच्या एकेरीत ब्राँझपदक मिळवले होते.

आतापर्यंत भारताने या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील इतिहासात एकूण ११ वैयक्तिक पदके जिंकली आहेत, ज्यामध्ये चार रौप्यपदकांचा समावेश आहे. या वर्षी सुवर्णपदकासाठी सर्वाधिक आशा मुलींच्या एकेरीत आहे, ज्यात तन्वी शर्मा आणि उन्नती हुडा भारताच्या मुख्य दावेदार आहेत. तन्वी शर्माला पहिल्या फेरीत बाय मिळाली असून, तिला उपांत्यपूर्व फेरीत इंडोनेशियाची सातवी मानांकित थलिता विरीवान हिच्याशी सामना करावा लागू शकतो. उन्नती हुडा ही दुसऱ्या फेरीत हाँगकाँगच्या लिऊ होई किउ अन्ना हिच्याशी सामना करेल. तसेच उपांत्यपूर्व फेरीत तिला दुसऱ्या मानांकित थायलंडच्या अनयापत हिचे आव्हान असू शकते.

भारतीय खेळाडू दुहेरीतही सहभागी होणार आहेत. भार्गव राम अरिगेला आणि विश्व तेज गोबुरू ही जोडी स्लोव्हेनियाच्या आंद्रेज मॅसेक व आंद्रेज सुची यांच्याविरुद्ध सुरुवात करेल. भाव्या छाब्रा आणि सुमीत ए. आर. यांचा पहिला सामना फिलिप क्रायगर बो आणि सॅलोमन थॉमासेन यांच्याशी होईल. विष्णु कोडे आणि मिथिलेश पी कृष्णन यांचा सामना सातवी मानांकित फ्रेंच जोडी थिबॉल्ट गार्डन आणि मॅडी सोव यांच्याशी होईल. भारताच्या लालथाजुआला हमारचा सामना अव्वल मानांकित इंडोनेशियाच्या मोहम्मद झकी उबायदिल्ला याच्याशी होण्याची शक्यता आहे. अकरावा मानांकित रौनक चौहानलाही चीनच्या ली झी हँगविरुद्ध खडतर सामना खेळावा लागेल. ज्ञान दत्त टीटी आणि सूर्याक्ष रावत यांचा तिसऱ्या फेरीतच सामना होऊ शकतो.

## टीम इंडियाकडे अजूनही सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी!

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये सामना रंगला. शेवटच्या षटकात ऑस्ट्रेलियाने बाजी मारून भारतावर ३ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाने ३३० धावा केल्या होत्या. ३३१ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी शेवटच्या षटकात षटकार मारून विजयाची नोंद केली. सेमीफायनलमध्ये जाण्यासाठी भारतीय संघाला हा सामना जिंकणं महत्वाचं होतं. पण हा सामना गमावल्यामुळे भारतीय संघाचं टेन्शन वाढलं आहे.

भारतीय संघ आणखी ३ सामने खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. पुढील सामने इंग्लंड, न्यूझीलंड आणि बांगलादेशविरूद्ध होणार आहे. संघाला हे पुढील तिन्ही सामने मोठ्या फरकाने जिंकावे लागणार आहेत. असं झाल्यास, भारतीय संघ १० गुणांपर्यंत पोहोचू शकतो. यासह भारतीय संघाच्या नेट रनरेटमध्येही आणखी भर पडू शकते. पण जर भारतीय संघाने ३ पैकी २ सामने जिंकले आणि १ सामना गमावला, तर भारतीय संघाच्या अडचणीत वाढ होऊ शकते. भारतासाठी सेमीफायनलमध्ये जाण्याचा मार्ग मोकळा असेल, पण भारतीय संघाला इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावं लागेल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)